बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे







गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ५२ | बुधवार, दि.४ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीसाठी महायुतीची जय्यत तयारी!

## ४० हजार पाहुणे, २२ राज्यांचे येणार मुख्यमंत्री



**मुंबई :–** महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार? यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नसले तरी शपथविधी ५ डिसेंबरला होणार असून त्याची जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे. आझाद मैदानात हा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला लाडक्या बहिर्णीना विशेष निमंत्रण देण्यात येणार आहे. तब्बल ४० हजार निमंत्रितांची जणांची उपस्थिती असेल, असे महायुतीच्या मंत्रालयीन सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

महायुतीच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीच्या सोहळ्याचं महानियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीसाठी जवळपास ४० हजारजणांची उपस्थिती असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी पार पडणार आहे. देशातील २२ राज्यांचे मुख्यमंत्री देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. लाडक्या बहिर्णीना यासाठी विशेष आमंत्रण देण्यात येणार आहे. जवळपास दोन हजार व्हीव्हीआयपींच्या पासेसची यासाठी सोय करण्यात येणार आहे.

### कशी असेल आसन व्यवस्था?

आझाद मैदानात १३ विशेष ब्लॉकमध्ये लोकांच्या बसण्याची व्यवस्था असणार आहे. यामध्ये तीन स्टेजची उभारणी केली जाणार आहे. एक मुख्य स्टेज आणि दोन त्याच्या आजूबाजूला छोट्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे. विविध धर्माचे संत–महंत, भाजपशासित राज्यातील मुख्यमंत्र्यांची यात उपस्थिती असेल. संत महंतांसाठी वेगळ्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे. खासदार आणि आमदारांसाठी देखील वेगळी आसनव्यवस्था केली जाणार आहे. महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसाठी देखील वेगळी आसन व्यवस्था असणार आहे.

### अमित शहांनी मागविले आमदारांचे रिपोर्ट कार्ड

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मंत्रीपदासाठी अटी जाहीर केल्या आहेत. या अटी पूर्ण करणाऱ्यांना मंत्रीपदे मिळणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंत्रिमंडळात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या आमदारांचे रिपोर्ट कार्ड मागवले आहेत. लोकसभा निवडणुकीत संबंधित आमदाराची कामगिरी कशी होती, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत संबंधित व्यक्तीने प्रामाणिकपणे काम केले का? हे पाहणे बाकी आहे. मंत्रिमंडळात इच्छूक माजी मंत्री असतील, तर महायुती सरकारच्या काळात संबंधित मंत्र्याने मंत्रालयात कशी काय सेवा केली? संबंधित व्यक्ती किती वेळ मंत्रालयात काम करत होती. महायुतीतील त्यांच्या घटक पक्षाच्या आमदारांशी मंत्र्याची वागणूक कशी होती? मंत्र्यांनी केंद्र आणि राज्याच्या निधीचे वाटप कसे केले? संबंधित मंत्री युती धोक्यात घालतील अशी परिस्थिती होती का? त्यांनी काही वादग्रस्त विधान केले होते का? या मुद्द्यांचे रिपोर्ट कार्ड घेऊन अमित शहा यांनी महायुतीच्या नेत्यांना दिल्लीत बोलावले आहे.

### निर्मला सीतारामन आणि विजय रुपाणी महाराष्ट्रासाठी भाजपाचे निरीक्षक

भाजपाने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची महाराष्ट्राचे केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. हे केंद्रीय निरीक्षक मंगळवारी राज्यात येणार असून ४ डिसेंबरला भाजपचा गटनेता निवडला जाणार आहे. भाजपच्या केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत विधिमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. त्यासाठी केंद्रीय निरीक्षक उद्या मुंबईत दाखल होतील. याकडे भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांचे डोळे लागले आहेत. दरम्यान, येथील आझाद मैदानावर सध्या शपथविधी सोहळ्याची जोरदार तयारी प्रशासनाने चालवली आहे.

# वसतिगृहांकडे ओबीसींची पाठ

## नागपूर विभागात ६५० जागा अजूनही रिक्त; सुविधांच्या अभावाचा आरोप

**गोंदिया:–** ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांत मुला–मुलींसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे १२ वसतिगृह सुरू करण्यात आले. प्रत्येकी शंभर क्षमतेप्रमाणे या वसतिगृहांमध्ये १ हजार २०० विद्यार्थ्यांचे प्रवेश अपेक्षित आहेत. पण, अजूनही अपेक्षित सुविधा उभारण्यात आलेल्या नसल्याने ओबीसी विद्यार्थ्यांनी वसतिगृहांकडे पाठ फिरविली आहे. तब्बल ६५० जागा रिक्त असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. वसतिगृहाची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शहरात उच्च शिक्षणासाठी भाड्याने खोली घेऊन राहावे लागते. परिणामी उच्च शिक्षणाची आवड असतानाही अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात.

या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाप्रमाणे ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची मागणी करण्यात आली होती. याची दखल घेत विधानसभा निवडणुकीपूर्वी ओबीसी वसतिगृह सुरू करण्यात आले. नागपुरात राज्यव्यापी कार्यक्रम घेण्यात आला. नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा अशा नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांत मुले–मुली यांच्यांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे १२ वसतिगृह उभारण्यात आले. या प्रत्येक वसतिगृहांची क्षमता शंभर विद्यार्थी इतकी असल्याने सहाशे मुले आणि सहाशे मुलींना जिल्हास्थळी शिक्षणासाठी हक्काचा आसरा मिळाला. मात्र प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सध्याच्या घडीला जेवणाचा खर्च स्वत: करायचा आहे. जेवणाची सोय अजूनही करण्यात आलेली नाही. जेवणाचा हा खर्च संबंधित विद्यार्थ्यांना वसतिगृहातील निवासाच्या हजेरी पटानुसार डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. परिणामी ओबीसी विद्यार्थ्यांनी या वसतिगृहांमध्ये प्रवेशच घेतलेला नसल्याचे रिक्त जागांवरून स्पष्ट होत आहे. तूर्त मुलांच्या वसतिगृहांमध्ये ३१० तर मुलींच्या वसतिगृहांमध्ये ३४० जागा रिक्त आहे आहेत.

नागपूर विभागात गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व वर्धा या जिल्हास्थळी असलेल्या वसतिगृहांत प्रत्येकी शंभर विद्यार्थी याप्रमाणे १,२०० विद्यार्थी प्रवेशित होणे अपेक्षित असताना २९० मुले व २६० मुली अशा ५५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. गोंदियात मुलांच्या ७३ व मुलींच्या वसतिगृहात ६७, भंडाऱ्यात मुले ४७ व मुली ४४, चंद्रपूरमध्ये मुले ५७ व मुली ८१, गडचिरोलीत मुले ५४ व मुली २३, नागपूरमध्ये मुले ३७ व मुली ६७ तर वर्ध्यात मुले ४२ व मुली ५८ अशा जागा रिक्त आहेत. रिक्त जागांवर इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज करून प्रवेश घेण्याचे आवाहन नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक वाकुडकर, समाजकल्याण गोंदियाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

### दोन महिन्यांपासून निर्वाह भत्ता नाही

**राज्यातील ओबीसी समाजातील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी सुरू करण्यात आलेले वसतिगृह भाड्याच्या इमारतीत आहेत. अपेक्षित सुविधा उपलब्ध नाही. जेवणाचीही वसतिगृहांमध्ये सोय नाही. “मेस’ उपलब्ध नसल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना ४ हजार ८०० रुपये निर्वाह भत्ता देण्याची तरतूद आहे. पण, दोन महिने उलटूनही एकाही विद्यार्थ्याला हा निर्वाह भत्ता अद्याप मिळालेला नाही.**

**राज्यातील ओबीसी विद्यार्थी–विद्यार्थिनींना वसतिगृहाची सोय व्हावी याकरिता सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे सरकारने वसतिगृह सुरू केले. तोवर प्रवेश प्रक्रिया आटोपली होती. अपेक्षित प्रवेश अर्ज आले नव्हते. तूर्त रिक्त जागांवर अर्ज मागविण्यात येत आहेत. वसतिगृहांची क्षमता पूर्ण झाल्याशिवाय आधार योजनेचा लाभ मिळणार नाही.**
**– विजय वाकुडकर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसीच्या नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक**

# मारकडवाडीला प्रशासन व निवडणूक आयोग इतकं घाबरलंय का?

**सोलापूर:**मारकडवाडीचं नाव सध्या महाराष्ट्रात सगळीकडे गाजतंय. गावकरी म्हणतायत की बॅलेट पेपरवर मतदान करा,ईव्हीएम मध्ये काहीतरी घोटाळा चाललाय.आता निवडणूक आयोगासाठी ही एकदम भारी संधी होती.लोकांना दाखवायचं होतं की ईव्हीएम पारदर्शक आहेत.पण इथे उलट प्रशासनानं ३०० पोलिसांची फौज पाठवलीय आणि जमावबंदी लागू केलीय. गावकऱ्यांना मतदानाच्या हक्कासाठी लढावं लागणं म्हणजे लोकशाहीतला धक्का नाही का?

सोलापूर जिल्ह्यातल्या माळशिरस मतदारसंघातल्या मारकडवाडी गावात मतपत्रिकेवर आज मतदान घेण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. ग्रामस्थांच्या या निर्णयावर प्रशासनाने आक्षेप घेतला आहे. गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गावात ५ डिसेंबरपर्यंत जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया सुरू केल्यास कायदेशीर कारवाई करणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली. अखेर मारकडवाडीतील बॅलेटवरील मतदान प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे.

### प्रशासनाला भीती कशाची?

गावकरी बॅलेट पेपरवर मतदान करायचं म्हणतायत, हे त्यांच्या मतांचा हक्क बजावण्यासाठीचं साधं मागणं आहे. पण प्रशासनाला वाटतंय की हे मागणं मान्य केलं तर काहीतरी उघड होईल. मग त्यांनी एतच च्या पारदर्शकतेचा पुरावा का दिला नाही?उलट,लोकांना थांबवण्यासाठी पोलिसांचा फौजफाटा लावला.आता प्रश्न असा आहे, प्रशासन लोकांचा विश्वास जिंकायचं ठरवतंय की लोकशाहीची भीती दाखवायचं ठरवतंय?

गावकऱ्यांना शांततेत मतदान करू द्यायचं सोडून त्यांना डांबून ठेवायचं प्रशासनाचं धोरण लोकांना अजिबात पटत नाही. जमावबंदी, पोलिस बंदोबस्त, सगळं बळाचा वापर करून होतंय. प्रशासन असं का वागतंय? आपली गडबड लपवायचा प्रयत्न चाललाय का? की एतच वरचा विश्वासच नाहीये?

### आयोगासाठी गमावलेली संधी

आता या परिस्थितीत निवडणूक आयोगानं बॅलेट पेपरचं मतदान घेतलं असतं, तर लोकांचा एतच वरचा संशय दूर झाला असता. पण असं न करता त्यांनी लोकांना मतदानाच्या अधिकारापासूनच दूर ठेवलं. लोकशाहीत लोकांच्या विश्वासावरच सगळं चालतं, पण इथे तोच विश्वास डळमळीत करायला लागलाय.

### लोकांचा आवाज का दाबलाय?

मारकडवाडीचं प्रकरण लोकशाहीसाठी धोक्याचं आहे. जर आज लोकांचा आवाज दाबलाय, तर उद्या सगळीकडे हेच होणार का? प्रशासनानं भीतीच्या पलीकडे जाऊन लोकांना त्यांचा अधिकार द्यायला हवा होता. पण सध्या परिस्थिती पाहता असं वाटतंय की, सरकार आणि प्रशासन लोकांच्या प्रश्नांना उत्तर द्यायच्या ऐवजी पळ काढतंय.मारकडवाडीचा प्रश्न हा फक्त एतच च्या विश्वासाचा नाही, तो लोकशाहीच्या भवितव्याचा आहे.

# नक्षल चळवळीला जिल्ह्यात उतरती कळा

## सी ६० पथकाच्या सततच्या शोध मोहिमेमुळे जिल्ह्यात नक्षल्यांवर अंकुश



**गोंदिया–**गेल्या काही वर्षापासून जिल्ह्यातील सालेकसा, देवरी, मोरगाव–अर्जुनी या तालुक्यातील घनदाट जंगलामध्ये तात्पुरता मुक्काम करण्यासाठी नक्षली थांबतात. हे तीन तालुके मोठ्या प्रमाणावर नक्षल प्रभावित आहेत. पोलिस प्रशासनाने नक्षलवाद्यांच्या हालचालीवर नियंत्रण आणण्यासाठी सशस्त्र पोलिसांसाठी चौक्याही उभारल्या आहेत. जंगलाचा आधार घेऊन नक्षलवादी या ठिकाणी आसारा घेतात. नक्षलवाद्यांचा रेस्ट झोन म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे.गेल्या चार–पाच वर्षभरात या ठिकाणी नक्षल चळवळीला रोखण्यात सततच्या शोधमोहिमेमुळे पोलिसांना यश आल्याचे दिसत आहे.त्यातच आदिवासी नक्षलग्रस्त भागातील जनतेशी संवाद साधत सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी जिल्हा पोलीस विभागाच्यावतीने नक्षलग्रस्त भागात आत्तापर्यंत ११ आर्म्ड(सशस्त्र दूरक्षेत्र)आऊट पोस्ट उभारण्यात आल्या आहेत.

सीपीआय माओवादी संघटनेच्या नक्षलवाद्यांकडून २ ते ८ डिसेंबर दरम्यान पीएलजीए सप्ताह स्थापना दिवस म्हणून नक्षलवादी साजरा करतात. या सप्ताहात नक्षलवाद्यांकडून घातपाताचे कृत्य होऊ नये, यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. या सप्ताहात नक्षलवादी घातपाताचे कृत्य करतात. महत्त्वाच्या व्यक्तीचे अपहरण, खून, जाळपोळ यांसारखे गंभीर गुन्हे करून शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. या कालावधीत नक्षलवादी आक्रमक भूमिका घेऊन अटकेतील नक्षलवाद्यांना पळवून नेण्याची शक्यता ही नाकारता येत नाही. पीएलजीए सप्ताहाच्या काळात नक्षलवाद्यांकडून घडवून आणल्या जाणाऱ्या हिंसक कृत्यांना आळा घालण्यासाठी १० डिसेंबर पर्यंत पोलिस बंदोबस्त ठेवला जाणार आहे.

नक्षल्यांच्या वाढत्या घातपाती कारवायांमुळे पोलिसांसह आदिवासीबांधवांनाही जीव गमवावा लागला. यावर उपाय म्हणून या भागातील आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रयोग राबविण्यात येत आहेत. जनजागरण मेळावे,युवकांकरीता प्रशिक्षण,शेतकरी वर्गाला शेतीचे साहित्यपासून इतर लहान सहान शासकीय योजनांचा लाभ दादालोरा खिडकीच्या माध्यमातून दिल्याने आदिवासी समाजामध्ये पोलिसांप्रती आत्मविश्वास व सरकारबद्दल आपुलकी निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.या प्रयोगामुळेच जिल्ह्यातील सिमावर्तीभागातील नक्षल मोहिमेवर आळा घालण्यात पोलीस प्रशासनाला यश आले,हे सत्य नाकारता येत नाही.

पुर्वी नक्षलग्रस्त आदिवासी भागातील आदिवासी युवक,महिला शेतकरी यांच्यामनात पोलीस व सरकारबद्दल नक्षल्यांनी पेरून ठेवलेल्या चुकीच्या गोष्टींची बाब हेरून मध्य प्रदेश,आंध्र प्रदेश, छत्तीसगड भागात घातपाती कारवाया केल्यानंतर नक्षली गोंदियाच्या जंगलात येऊन विश्रांती करायचे.त्यामुळे गोंदिया हा रेस्ट झोन म्हणूनच नक्षल्यांमध्ये प्रसिद्ध आहे. याची कबुली दस्तरखुद्द पोलिस अधिकारी आजही देतात.त्यामुळे गोंदिया जिल्हा नक्षल चळवळीचे केंद्र ठरले आहे. या भागात अनेक नक्षली नेत्यांना अटक करण्यात आले आहे. यात परेरा, मुरली यासारख्यांचा समावेश आहे. या कारवायांचा धसका घेत नक्षल्यांनी आपले बस्तान इतरत्र हलविले आहे.

गेल्या २४ वर्षात जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या १३४ हिंसक कारवाया झाल्या आहेत. यामध्ये सामान्यनागरिकांसह २२ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला.२०१९ पासून या ५ वर्षाच्या काळात नक्षलवाद्यांकडून एकही कारवाई झाली नाही.गोंदिया पोलीस नक्षलग्रस्त भागात मोठ्या प्रमाणात जनजागृती करत आहेत. तरुणांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे नक्षलग्रस्त क्षेत्रातील तरुण आता नोकरीकडे वळत आहेत. परिणामी नक्षली कारवायांमध्ये घट झाली आहे. हे तरुण आता चळवळीला फाटा देत नक्षलविरोधी मोहिमेमध्ये पोलिसांना साथ देत आहेत.

### जिल्ह्यातील दलम

जिल्ह्याचा विचार करता देवरी, दरेकसा, स्पेशल गुरील्ला स्कॉड, तांडा, कुरखेडा हे पाच दलम सक्रिय असल्याचे दिसून येतात. गडचिरोलीतील कोरची दलम हे देखील गोंदिया जिल्ह्यातच मोठ्या प्रमाणावर घातपात घडवून आणत असते. जिल्ह्यात आतापर्यंत २० च्या जवळपास नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले आहे.यामध्ये मुरली परेरा सारख्यांना गोंदिया पोलिसांनी पकडले आहे.

### १९८९ पासूनच्या कारवाया

तत्कालीन भंडारा आणि आत्ताच्या गोंदिया जिल्ह्यात १९८९ च्या दशकापासून नक्षल चळवळीने आपले पाय रोवले. या पहिल्याच वर्षी नक्षल्यांविरोधात १२ गुन्हे नोंदविण्यात आले. त्यामध्ये हत्या, चोरी, दरोडे यासारख्या घटनांचा समावेश आहे. १९९१ मध्ये पहिली पोलिस – नक्षल चकमक झाली. त्यानंतर अनेकदा रक्तपात घडविण्यात आला. १९९३ नंतर नक्षल कारवाया वाढल्या. १९८९ मध्ये १२ गुन्हे नक्षल्यांविरोधात दाखल करण्यात आले. त्यात दोन घटना जाळपोळीच्या होत्या. १९९१ मध्ये पोलिस आणि नक्षल्यात दोन चकमकी झाल्या. त्यानंतर १९९२ मध्ये दोन, १९९३ मध्ये सात चकमकी, १९९४ मध्ये दोन, १९९५ मध्ये चार, १९९६ मध्ये दोन, १९९७ मध्ये तीन, १९९८ मध्ये १,१९९९ मध्ये ९,२००१ मध्ये ५, २००२ मध्ये ८, २००३ मध्ये १३,२००४ मध्ये ४,२००६ मध्ये १५,२००७ मध्ये ६,२००८ मध्ये ३, २००९ मध्ये १०, २०११ मध्ये ९,२०१२ मध्ये १७,२०१३ मध्ये ३,२०१४ मध्ये ३,२०१५ मध्ये २,२०१६ मध्ये ३,२०१७ मध्ये ४ व २०१८ मध्ये १० कारवाया झाल्या आहेत.

### नक्षल्यांचा घातपाताचे डाव सुरूच सतर्कतेची अधिक गरज– विशेष पोलीस महानिरिक्षक संदिप पाटील



गोंदिया जिल्ह्यात पोलीस,केंद्रीय राज्य राखीव दल,सी ६० पथकासोबतच इतर यंत्रणेने सातत्याने सतर्क राहून आणि नागरिकांपर्यंत पोचून नक्षल्यांच्या चुकीच्या भूमिकेची जाणीव आदिवासी नागरिकांना करुन दिली आहे.त्यामुळे जनता हळूहळू प्रशासनासोबत येत असतांनाच सर्चिंगचेही प्रमाण वाढले आहे.गोंदिया जिल्हाची सीमा ही शेजारील मध्यप्रदेश छत्तीसगड व गडचिरोली जिल्ह्याला लागून असल्याने या तिन्ही भागातील नक्षल दलम या भागात कारवाया केल्यानंतर इकडे येतात,त्यामुळे आपल्या भागात सतर्कतेचीही तेवढीच महत्वाची गरज आहे.त्यातच पोलीस विभागाने दादालोरा खिडकीच्या माध्यमातून जे काम आदिवासी नक्षलग्रस्त भागात केले आहे,त्यामुळे जनतेचा विश्वास हा पोलीस यंत्रणेशी दृढ झालेला आहे. गेल्या तीन चार वर्षात नक्षल्यांच्या कारवाया आपल्या जिल्ह्यात नाहीत यामुळे जिल्हा शांत झालेला आहे असे म्हणने योग्य होणार नाही,कारण सातत्याने नक्षल्यानी घातपाताच्या दृष्टीने पेरलेले विस्फ्रोटक साहित्य पोलिस यंत्रणा ज्यापध्दतीने शोध घेऊन हस्तगत करीत आहे,त्यावरुन नक्षली मोठ्या कारवाईच्या तयारीत असल्याचेच हे चिन्ह असल्याने प्रशासनासह सर्वानांच सतर्क राहण्याची गरज असल्याची माहिती नक्षल विरोधी मोहिमेचे विशेष पोलीस महानिरिक्षक संदिप पाटील यांनी बेरार टाईम्सशी बोलतांना दिली.

### नक्षलवादी करीत आहेत आत्मसमर्पण

महाराष्ट्रातील गडचिरोली व गोंदिया या दोन जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हिसक कारवाया पहायला मिळतात. विकासाच्या कामात अडथडा आणण्याचे काम नक्षलवाद्यांकडून केले जाते. नक्षलवादी व पोलीस यांच्या दरम्यान असलेल्या ग्रामीण भागातील जनतेला नेहमी दहशतीच्या सावटात जीवन जगावे लागते. आता ही स्थिती बदलत आहे. मागील काही दिवसांपासून नक्षलवादी पोलिसांच्या समोर आत्मसमर्पण करत असल्याने नक्षल चळवळीला चांगलाच हादरा बसला आहे.त्यातच आत्मसमर्पीत नक्षल्यांना पोलीस विभागाच्यावतीने शिक्षण व रोजगाराच्या संधीही उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

### खबरदारी:एसटी महामंडळाचा सावध पवित्रा

नक्षल्यांनी पुकारलेल्या सप्ताहा दरम्यान सुरक्षेचा उपाय म्हणून गोंदिया एस टी आगाराने काही संवेदनशील जंगल मार्गावरील बसेस बंद केल्या आहेत. यात गोंदिया ते चांदसूरज, बंजारी, खोलगड, बिजेपार या गावांतील प्रवाशांना सप्ताहादरम्यान बससेवे पासून वंचित राहावे लागणार आहे. नक्षलप्रभावित भागातील जांभडी बस गोरेगाव येथे, तर डोमाटोला बसचा थांबा बिजेपार पोलीस चौकीत असणार आहे.

# नक्षल सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी महिला माओवादीचे आत्मसमर्पण

**गडचिरोली :–** आठ वर्षांपूर्वी अहेरी दलममध्ये भरती झालेल्या आणि सध्या भामरागड दलममध्ये कार्यरत असलेल्या महिला माओवादीने गडचिरोली पोलीस आणि सीआरपीएफच्या पथकापुढे आत्मसमर्पण केले. २ डिसेंबरपासून नक्षलवाद्यांचा पीएलजीए सप्ताह सुरू झाला. या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी पोलिसांना हे यश मिळाले आहे.

तारा ऊर्फ शारदा ऊर्फ ज्योती दस्सा कुळमेथे (२८ वर्ष) असे त्या आत्मसमर्पित नक्षलीचे नाव आहे. ती



अहेरी तालुक्यातील नैनेर या गावची रहिवासी आहे. तिच्यावर खुनाचे ३ तर चकमकीचे ८ गुन्हे दाखल आहेत. शासनाने तिच्यावर २ लाखांचे इनाम ठेवले होते.

तारा ही सन २०१६ मध्ये अहेरी दलममध्ये सदस्य पदावर भरती झाली होती.२०२४ मध्ये ताडगाव येथील एका निरपराध इसमाच्या खुनामध्ये तिचा प्रत्यक्ष सहभाग होता.नक्षल दलममधील अहोरात्र भटकंतीचे जीवन असल्यामुळे, आरोग्याविषयी समस्या उद्भवल्यास त्याकडे काळजीपुर्वक लक्ष दिल्या जात नसल्याने वरीष्ठ माओवादी नेते गरीब आदिवासी युवक–युवतींचा वापर आपल्या फायद्यासाठी करून घेत असल्याने कंटाळून आत्मसमर्पण केल्याचे तिने पोलिसांना सांगितले.

# शासकीय धान खरेदी संस्थांना दिलासा, आता शासनाने मंजूर केली दोन टक्के तूट

## तुट कमी असल्याने होत होते आर्थिक नुकसान, केंद्र व राज्य शासनाने मंजूर केली तूट



**गोंदिया:–** शासकीय धान खरेदी केंद्रावर हमीभावाने धान खरेदी करणाऱ्या सहकारी संस्थांना चालू हंगामासाठी केंद्र शासनाकडून अर्धा आणि राज्य शासनाकडून दीड टक्का तूट मंजूर करण्यात आली आहे. गेल्या वर्षी शासनाने कमी तूट मंजूर केल्याने संस्थाचालक अडचणीत आले होते. तर काही संस्था चालकांनी या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर आता राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने तुटीत वाढ करण्याचा निर्णय घेतला असून आता संस्थांना एकूण २ टक्के तुट मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश शासनाने २ डिसेंबर रोजी काढले आहेत.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी शासन जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत सहकारी संस्थांच्या माध्यमातून हमीभावाने धान खरेदी करते. हमीभाव केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची राईस मिलर्ससह करार केला व भरडाई करुन तांदुळ शासनाकडे जमा केला जातो. पण गेल्यावर्षी भरडाईसाठी धानाची उचल करण्यात आठ ते नऊ महिने लागले होते. परिणाम हा धान संस्थाच्या गोदामात तसाच पडून होता.

परिणामी खरेदी केलेल्या धानात मोठ्या प्रमाणात तुट आली. याचा भुर्दंड धान खरेदी करणाऱ्या संस्थांना बसल्याने त्या अडचणीत आल्या होत्या. त्यामुळे सर्व संस्थांनी एकत्र येत धानाची तूट तीन ते चार टक्के करण्याची मागणी केली अन्यथा धान खरेदी न करण्याची भूमिका घेतली होती. तर काही संस्थांनी या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. यामुळे धान खरेदीत अडचण निर्माण होऊ नये व शेतकऱ्यांना याचा फटका बसू नये याकरिता तेव्हा खा. प्रफुल्ल पटेल यांनी केंद्र व राज्य सरकारसह चर्चा करुन तूट वाढविण्याची मागणी केली होती. पण विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने यावर निर्णय घेता येत नव्हता. निवडणूक आचारसंहिता संपताच राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने २ डिसेंबर रोजी धानाची तूट वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता धान खरेदी करणाऱ्या संस्थांना राज्य शासनाकडून दीड टक्का आणि केंद्र सरकारकडून अर्धा टक्का असे एकूण दोन टक्के तूट मिळणार आहे. यामुळे धान खरेदी होणारे नुकसान काही प्रमाणात टाळण्यास मदत होणार आहे.

### प्रफुल्ल पटेल यांच्या पाठपुराव्याला यश



**धान खरेदी करणाऱ्या संस्थांना तूट कमी असल्याने नुकसान सहन करावे लागत होते. यासंदर्भात शिष्टमंडळाने खा.प्रफुल्ल पटेल यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. यानंतर खा.पटेल यांची गांभीर्याने दखल घेत केंद्र व राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्या पाठपुराव्याला यश आले असून आता धान खरेदी करणाऱ्या संस्थांना २ टक्के तूट मिळणार आहे.**

### चूक शासनाची भुर्दंड बसत होता संस्थांना

**शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शासकीय धान खरेदी केंद्रावरील धानाची उचल होण्यास विलंब होत होता. मात्र यामुळे धान खरेदी करणाऱ्या संस्थांना गोदाम भाडे आणि प्रतिक्विंटल धानामागे येणाऱ्या तूटीचा भुर्दंड सहन कराा लागत होता. पुर्वी केवळ एकच टक्का तूट मिळत होती. आता २ डिसेंबरच्या निर्णयाने यात १ टक्क्याने वाढ केली आहे.**

### ही तूट केवळ याच हंगामासाठी

**अन्न व नागरी पुरवठा विभागाने २ डिसेंबर रोजी काढलेल्या जीआरनुसार याच हंगामासाठी लागू असणार आहे. पुढील हंगामासाठी ती लागू नसणार आहे.**

## संपादकीय

# तापलेले राजकारण अन गारठलेली जनता

राज्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या. निकालही जाहीर झाले. महाराष्ट्रातील जनतेने महाविकास आघाडीला नाकारत महायुती सरकारला भरभरून मतदान केले. महायुतीला महाराष्ट्रीय जनतेने इतके भरभरून प्रेम केले आहे की, महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपदही मिळविणे शक्य झाले नाही. महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांची एकत्रितरित्या जागांची बेरीज केली तरी शिंदेंच्या शिवसेनेचे संख्याबळ जास्त आहे. महायुतीला सर्वाधिक जागा मिळूनही मुख्यमंत्रीपदाचा घोळ सुरू असल्याने निकाल लागून आठ दिवसांचा कालावधी लोटला तरी मुख्यमंत्रीपदासाठी नाव अजून जाहीर झालेले नाही. केवळ शपथविधीची वेळ आणि स्थळ जाहीर झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात राजकारणात गरमागरमी सुरू असून अनेक आमदारांची मंत्रीपदासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे.

राज्यातील राजकारणात उकाडा असला तरी महाराष्ट्रातील जनतेला गुलाबी थंडीचे बोचकारे सहन करावे लागत आहेत. राज्यात ऑक्टोबर महिन्यात उकाडा वाढला होता. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी तापमनात मोठी वाढ नोंदवण्यात आली होती. त्यामुळे थंडी कधी पडणार असा प्रश्न सर्वांना पडत होता, मात्र गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागात थंडीचा प्रभाव वाढला असून ठिकठिकाणी सकाळच्या वेळी शेकोट्याही पेटलेल्या दिसत आहेत. राज्यातील राजकारण तापलेलं असताना राज्यात थंडीने मार्केट जाम केले आहे. गेल्या काही दिवसांपासून उभा, आडवा महाराष्ट्र थंडीने गारठला आहे. राजस्थान व अन्य ठिकाणी बर्फ पडल्याने आपल्या राज्यात थंडीचे प्रमाणही वाढीस लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून रात्री थंडीचा अंमल होताच, पण आता दिवसाही थंडीचा दरारा पाहायला मिळणार आहे. त्यामुळे घरामध्ये अडगळीत पडलेला स्वेटर आता दोन महिने भाव खावून जाणार आहे. राज्यात मुख्यमंत्री पदावरून राजकारण तापलेलं असताना थंडीने मार्केट जाम केले आहे. अवघा उभा-आडवा महाराष्ट्र थंडीच्या पड्यात आला आहे. गावापासून ते शहरापर्यंत थंड हवेमुळे नागरिकांना हुडहुडी भरली आहे. गेल्या काही दिवसांपासून थंडीचा अंमल होताच पण आता दिवसासुद्धा बोचरी, गुलाबी थंडी प्रत्येकाला जाणवत आहे. आता गेल्या आठ महिन्यांपासून अडगळीत पडलेल्या स्वेटरला आता भाव आला आहे. तर काही जणांनी ऊबदार कपड्यांसाठी बाजारपेठ जवळ केली आहे.

यंदा गारठा अधिक असण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून स्वेटर, शाल, हातमोजे खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. बंगालच्या उपसागरावरील वादळी वाऱ्यांनी थंडीचा खलिता पाठवला आहे. त्यातच उत्तरेकडून येणाऱ्या शीत लहरींनी गारठ्याचे प्रमाण वाढवले आहे. बोचरी थंडी जाणवत असल्याने शुष्क, कोरडेपणा वाढत आहे. काहींना अंगाला खाज जाणवत आहे. या सर्व हवामान घडामोडींमुळे अनेकांचा वीकेंड एक तर उबदार कपड्यात अथवा पर्यटन स्थळी जाण्याची शक्यता आहे. या काळात हाडे गोठवणारी थंडी वाढण्याचीही शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात येत आहे. महाबळेश्वर आणि इतर थंडीच्या ठिकाणांपेक्षा राज्यातील काही भागात थंडीचा कडाका वाढू लागला आहे. यंदा थंडीचा कडाका दरवर्षीच्या तुलनेत लवकर जाणवत असून जानेवारीच्या मध्यापर्यंत थंडीचा तडाखा जास्त जाणवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अनेक शहरांमध्ये पारा घसरला असून थंडीत मोठी वाढ झाली आहे. अनेक शहरांमध्ये किमान तापमानात घट होऊन ते एका अंकावरती आले आहे. मुंबई, पुण्यासह राज्याच्या उर्वरित भागातही थंडीने जोर पकडला आहे. मुंबईत यंदाच्या मोसमातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. महाबळेश्वरपेक्षाही अहमदनगर थंडीने गारठले आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यात आता गारठा वाढला आहे. जळगाव, पुणे, सांगली, नागपूर, नाशिक आदि जिल्ह्यांत तापमान घसरले आहे. भारतात हवामानानुसार त्या त्या साहित्याची विक्री होत असते. अर्थात ही विक्री हंगामी असली तरी अर्थकारणातील आकडेवारी ही लाखोंच्या घरात असते. पावसाळ्यात छत्र्या, रेनकोट, पावसाळी चपला, बूट, गमबूट याची विक्री वाढते, तर हिवाळ्यात स्वेटर, हातमोजे, शाल व शहरी भागात शेकोटीसाठी लाकडे याची उलाढालमधील आकडेवारीदेखील अचंबित करणारी असते.

राज्यात तापमानामध्ये बदल झाल्याने काही भागात आजारांची साथ पसरली असून दवाखाने व रुग्णालयामध्ये रुग्णांची गर्दीही दिसत आहे. अनेकांना थंडी सहन होत नसल्याने घराघरामध्ये उकाडा निर्माण करणारे हिटरचे आगमन झाले आहे. ग्रामीण भागामध्ये मात्र बळीराजाला थंडी कितीही वाढली तरी पिकांना पाणी देण्यासाठी, खत टाकण्यासाठी, औषधांची फवारणी करण्यासाठी शेतामध्ये सकाळ, दुपार, सायंकाळी, रात्री-अपरात्री जावेच लागते. राज्यात थंडी कितीही वाढली तरी बळीराजाच्या इच्छाशक्तीला पराभूत करण्याची ताकद कोणत्याही थंडीमध्ये नसल्याचे आपणास वर्षानुवर्षे पाहावयास मिळत आहे, अनुभवयास मिळत आहे. जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा स्वत:च्या जीविताची पर्वा न करता ऊन, वारा, थंडीत जगाला अन्न-धान्य देण्यासाठी राबत असतो. पिकविलेल्या भाज्यांना, धान्याला बाजारभाव मिळेल की नाही याबाबत कोणतीही शाश्वती नसताना बळीराजा शेतात राबत असतो. राजकीय घडामोडींनी महाराष्ट्रातील राजकीय वातावरण एकीकडे ढवळून निघालेले असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील जनतेवर वाढत्या थंडीमुळे गारठण्याची वेळ आली आहे. गुलाबी थंडीमुळे मॉर्निंग वॉकला जाणारी मंडळी आता चहाच्या टपरीवर गर्दी करू लागली आहेत. थंडीमध्ये चहाचा आस्वाद घेणारी मंडळी राजकारणाच्या गप्पांमध्ये शाब्दिक वादविवाद करताना पाहावयास मिळत आहे. आपल्या देशात राजकारण हा असा एकमेव विषय आहे की, कडाक्याचे ऊन, मुसळधार कोसळधार, हाडे गोठविणारी थंडी असली तरी माणसे राजकारणाच्या विषयावर कित्येक तास बोलू शकतात. त्यांना वेळेचे बंधन नसते. सध्या महाराष्ट्रात वातावरणात गारठा आणि राजकारणात उकाडा असे दुहेरी चित्र निर्माण झाले आहे.

# फुले-आंबेडकरी वाङ्यकोशात गोंदिया जिल्ह्यातील पाच कवी-लेखकांची नोंद

गोंदिया:- 'फुले-आंबेडकरी वाङ्यकोश' या चौदाशे पानांच्या ग्रंथात ५५० साहित्यिकांच्या साहित्याची त्यांच्या परिचयासह दखल घेण्यात आली असून गोंदिया जिल्ह्यातील माणिक गेडाम, युवराज गंगाराम, बापू इलमकर, कालिदास सूर्यवंशी आणि सालेकसा येथे मंडळ कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले नंदू वानखडे या पाच साहित्यिकांची नोंद करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातून निवृत्त झालेले नामवंत कवी, संशोधक व समीक्षक प्रा.डॉ. महेंद्र भवरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संपादित केलेला सदर ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झालेला आहे.

प्रख्यात विचारवंत लेखक, भारतीय राज्य घटनेचे भाष्यकर, तथा पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ.रावसाहेब कसबे यांच्या हस्ते सदर मौलिक ग्रंथाचे पुणे येथे प्रकाशन झाले आहे. या ग्रंथात फुले-आंबेडकरी साहित्याच्या सन १९५६ च्या प्रारंभापासून २०२२ पर्यंतच्या जवळ-जवळ सत्तर वर्ष कालावधीतील दिवंगत व हयात असलेल्या ५५० स्त्री-पुरुष लेखकांचा समावेश आहे. त्यामुळे पुढील पिढ्यांना, सामान्य वाचक, विद्यार्थी, संशोधक व अभ्यासकांना हा कोश संदर्भ ग्रंथ म्हणून पूरक ठरणार असल्याचे मत डॉ. रावसाहेब कसबे यांनी व्यक्त केले आहे

तर गोंदिया जिल्ह्यातील पाच कवी-लेखकांचे भिन्नभाषी साहित्य मंडळाचे संयोजक शशी तिवारी, रमेश शर्मा, प्रकाश मिश्रा, छगन पंचे, निखिलेशसिंह यादव, मनोज बोरकर, सुरेंद्र जगने, किसनसिंह गुरु, रुपचंद जुम्हारे, चंद्रप्रकाश बनकर यांनी अभिनंदन केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शिक्षणप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि विद्यार्थी



शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. त्यासाठी समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे. त्याकाळी तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये, समाजाच्या चुकीच्या विचारसरणीमुळे बहुजनांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. बाबासाहेबांचे (Babasaheb Ambedkar) वडील सैन्यात असल्याने विशेष शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षण मिळाले. विद्यार्थी दशेपासून बाबासाहेबांनी जातिभेद, अपमानाकडे दुर्लक्ष करीत आपले शिक्षण चालू ठेवले. मॅट्रिकच्या शिक्षणानंतर बडोद्याच्या सयाजी गायकवाड यांनी त्यांची प्रखर बुद्धिमत्ता पाहून, शिष्यवृत्तीवर शिकायला परदेशात पाठविले.

बाबासाहेब चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे यश साजरे करताना दादासाहेब केळुसकरांनी "बुद्धाचे चरित्र' हे पुस्तक भेट दिले होते. नकळत त्याच पुस्तकांनी त्यांना साद घातली. गुरू गौतम बुद्धांची शिकवण आणि महात्मा फुलेंच्या कार्याचा त्यांच्या जीवनावर प्रभाव होता. संत कबीर आणि शाहू महाराजांना बाबासाहेब गुरू मानीत.

### लंडनमध्ये घडलेली छोटी घटना

बाबासाहेब, लंचब्रेकमध्ये ग्रंथालयात बसून ब्रेड खाताना ग्रंथपाल यहुदीने त्यांना पकडले. दंड आकारला, त्यांची सदस्यता रद्द करणाऱ्यांची धमकी दिली. बाबासाहेबांनी प्रथम माफी मागत नम्रपणे मी येथे कोणत्या कारणासाठी आलो ते खरे सांगितले. कॅफेमध्ये खाण्यासाठी माझ्याकडे वेळ आणि पैसाही नाही. त्यांचे प्रामाणिक उत्तर ऐकल्यावर ग्रंथपाल यहुदी म्हणाले, आजपासून मी माझे जेवण तुमच्याबरोबर वाटून खाणार.

परदेशात शिकत असताना, नवा देश, नवी संस्कृती, नवे ज्ञान अनुभवले. माणसा-माणसांतील संबंधातील जाण आली. भेदभावाची कृत्रिम बंधनं नसलेला मुक्त समाज पहिला. शिक्षणाबरोबर बाबासाहेबांचे व्यक्तिमत्वही विकसित झाले. त्यांनी ओळखले, समाजातील परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही.

बॅरिस्टर होऊन डॉ. बाबासाहेब भारतात आल्यावर आपल्या बांधवांचे, दलितांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले; नव्हे त्यासाठीच भारतात आले. गुलामगिरीच्या बेड्या तोडून प्रथम त्यांना ताठ मानेने, स्वाभिमानाने जगायला शिकविले. निर्भय केले. शोषित वर्गाचे शिक्षण झालेच पाहिजे, हा बाबासाहेबांचा आग्रह. त्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांच्या वसतिगृहाची, रात्रीच्या शाळेची सोय करून, शिक्षणाची प्रेरणा दिली. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश सगळ्यांना दिला. त्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, कालांतराने सिद्धार्थ, मिलिंद या मुंबई, औरंगाबाद येथे शिक्षण संस्था काढल्या.

त्या आधी दलित बांधवांच्या व्यथा मांडण्यासाठी शाहू महाराजांच्या मदतीने "मूकनायक', बहिष्कृत ही पाक्षिके; समाजाच्या, दलितांच्या विकासासाठी विविध वृत्तपत्रे, नियतकालिके चालवली. तरुणांसाठी क्रीडा मंडळे, विधायक संस्था, परिषदा, सभा-मेळाव्यांतून शिक्षणाचे महत्त्व सांगत होते.

"बहिष्कृत हितकारिणी' या संस्थेपासून डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने सार्वजनिक आयुष्याला सुरुवात केली. "शिकवा, चेतवा आणि संघटित करा' या "हितकारिणी' संस्थेच्या ब्रीद वाक्यांत शिक्षणाला अग्रक्रम होता. दादासाहेब गायकवाडांना पत्रात लिहितात, "आपण इंग्रजीचा अभ्यास चालू ठेवायला हवा. इंग्रजीचे अज्ञान सार्वजनिक कामात पदोपदी नडेल, तरी इंग्रजीकडे दुर्लक्ष करू नका.' यावरून शिक्षणविषयक त्यांचा प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो. महात्मा फुल्यांचा, सामाजिक, शैक्षणिक विषमता निर्मूलनाचा वारसा आंबेडकरांनी समर्थपणे पुढे नेला.

विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणसंस्थेचे निर्माते असा शिक्षणक्षेत्रात बाबासाहेबांचा चढता आलेख आहे. ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे.' म्हणून १४ वर्षापर्यंतचे प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे आणि मोफत केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांचे ज्ञान, वाचन, व्यासंग, लेखन, चिंतन आणि वक्तृत्व असे चौफेर व्यक्तिमत्त्व. त्यांचा स्वतःचा मोठा ग्रंथसंग्रह होता. स्वतः ते अठरा-अठरा तास अभ्यास करीत. शिक्षणासाठी जगभ्रमंती करून, आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून, अनेक विषयांत प्रभुत्व, अनेक पदव्या, अनेक भाषा प्राप्त केल्या होत्या. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचा पुतळा किंवा चित्र पुस्तकांशिवाय पूर्ण झालेले दिसत नाही.

डॉ. बाबासाहेबांची विद्वत्ता, शैक्षणिक योग्यता, प्रतिभा व्यापक आणि भव्य होती. म्हणून त्यांना "जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ती' तसेच "सिम्बॉल ऑफ नॉलेज' म्हणून ओळखले जाते.

बाबासाहेबांचे विद्यार्थ्यांशी अतूट संबंध होते. "विद्यार्थ्यांनो जागृत राहा' या लेखात त्यांनी त्यांचे शिक्षण काळातील क्षणा-क्षणाचे महत्त्व विशद केले आहे. ते सांगतात, "काय शिकावं, हे विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. स्वतःची लायकी विद्यार्थीदशेतच वाढवा.' ज्ञान प्राप्त करण्याच्या संदर्भात म्हणतात, "विद्यार्थ्यांनो तुम्ही नुसते शिक्षण घेऊ नका, जे शिक्षण घ्याल, त्यात स्वतःला सिद्ध करा.'

पुणे येथील एका संमेलनात डॉ. आंबेडकर म्हणाले, "मी आजन्म विद्याथी आहे.' अति उच्च दर्जाची विद्वत्ता, ज्ञान असतानाही स्वतःला आजन्म विद्यार्थी मानणं आणि ते आदर्श विद्यार्थी ठरले, म्हणून शासनाने राज्यांत त्यांचा शाळा प्रवेशाचा दिवस (७ नोव्हेंबर) हा विद्यार्थी दिन म्हणून पाळला जातो.

### डॉ. आंबेडकरांचे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक विचार

१. राष्ट्रहित आणि समाजहिताचे भान ठेवते ते खरे शिक्षण.

२. शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुला-मुलींना शिकू द्या. बालपणीच लग्न करू नका. शिक्षणामुळे आचार-विचारात बदल होतो.

३. मुला-मुलींच्या मनातील न्यूनगंड दूर करून त्यांना परंपरागत कामात न गुंतवता महत्त्वाकांक्षी बनवा.

४. विद्यार्थ्यांमध्ये राजकीय विचार रुजवावेत यासाठी ते सतत प्रयत्नशील होते.

५. विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन अज्ञान व खुळ्या समजुती दूर केल्या पाहिजेत.

६. मी प्रवास करताना मजजवळ नेहमी चार पुस्तके व वर्तमानपत्र असतात.

७. मला माणसांच्या सहवासापेक्षा पुस्तकांचा सहवास अधिक आवडतो.

८. देशाच्या विकासासाठी, बाबासाहेबांना त्यांचा विद्यार्थी हा भारतासाठी जगणारा, विज्ञानवादी असायला पाहिजे.

९. आपण राजकीय चळवळीला जेवढे महत्त्व देतो, तितके शिक्षण प्रसाराला देत नाही.

१०. डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्तीला; अस्तित्वाची, क्षमतेची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण! निर्भय व्हा आणि जगाचे राज्य मिळवा.

शिक्षणप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "लोकशिक्षण' या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य केले. ते सांगतात, "विद्यार्थ्यांनो लक्षात ठेवा, शिक्षणाअभावी माणूस सर्वस्व गमावतो. सर्व मानव जन्मजात समान असून प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. त्यासाठी सर्वांनी शिकले पाहिजे.'

६ डिसेंबर, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**- मृणालिनी कुलकर्णी**

# ११ डिसेंबरपासून संत लहरी बाबांचा १०२ वा जयंती सोहळा

**गोंदिया:-** संत श्री लहरी बाबा म्हणून प्रसिद्ध परमपूज्य संत श्री जयरामदास यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त आठवडाभराचा सोहळा ११ ते १७ डिसेंबर दरम्यान साजरा केला जाणार आहे. गोंदियातील संत श्री लहरी बाबा आश्रम संस्थान (मध्यकाशी) कामठा येथे यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.संस्थानचे पीठाधीश परमपूज्य संत डॉ.खिलेश्वर उर्फ तुकड्या बाबा आणि अध्यक्ष परम पूज्य गोपाल बाबा सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.



११ ते १२ डिसेंबर दरम्यान गोंदिया, भंडारा, बालाघाट, चंद्रपूर आणि गडचिरोली या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेली आंतरजिल्हा भजन स्पर्धा होणार आहे. आठवडाभर चालणाऱ्या या सोहळ्याची सुरुवात लहरी प्रार्थना, संत साहित्य ग्रंथ दिंडी, प्रभातफेरी, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, ग्रामस्वच्छता मोहीम, श्री लहरी सच्चरित मानसाचे पठण, महामृतंजय यज्ञ, विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा कार्यक्रमांनी होणार आहे. प्रख्यात कीर्तनकार नानिकराम टेंबरे यांचे कीर्तन, तुलसी पंचेश्वर, अजय पटले द्वारा भजन, ललित संगीत, दीपोत्सव, श्री लहरी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम, गोपाळकाला व महाप्रसाद होणार आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या लहरी ब्रम्हा साक्षात्कार मंदिराचे उद्घाटनही करण्यात येणार आहे.

खासदार डॉ.प्रशांत पडोळे (गोंदिया-भंडारा), आमदार विनोद अग्रवाल (गोंदिया), आमदार अनुभा मुंजारे (बालाघाट), सरपंच रेखा जगणे, जिल्हाधिकारी प्राजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, माजी मंत्री रामकिशोर कावरे, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, राजेंद्र जैन, हीना कावरे, ॲड. संजय धोटे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त दिशा पाजई, हिंदू महासभेचे अध्यक्ष मुकेशनाथजी महाराज (वर्धा), तिरखेडी आश्रमाचे संत ज्ञानीदासजी महाराज, भारतीय राखीव बटालियनचे कमांडट अमोल गायकवाड, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा उषा मेंढे, विजय बहेकर, डॉ. नोव्हेल ब्रम्हणकर, डॉ. प्रमेश गायधने (दोन्ही गोंदिया), डॉ. पंकज कारेमोरे (तुमसर) आदी अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, शेजारील मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि इतर ठिकाणांहून लाखोंच्या संख्येने भाविक जन्मोत्सवाला उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोविंद बारापात्रे, दिनकर भुसारी, रुस्तम लिल्हारे, विजय खोके, ओम म्हशाखेत्री, सुभाष राजापुरे, संजय धोटे, डॉ. अरुण कुथे, डॉ.मंगेश भालोटिया, रामकृष्ण वाघाडे, लीला लिल्हारे, जैमिनी धावडे, सुनील कुरमभट्टी, गुणवंत जाधव, भारती कुरमभट्टी, अविनाश चौधरी, डॉ.संजय दाणाव, नरेंद्र तपासे, अरुण मते, डॉ.रामेश्वर माने, तुषार सिन्हा, बबलू श्रीवास्तव, वैशाली वैरागडे, मंदा गोन्नाडे, अपूर्व गौरखेडे, सोनाली कुरमभट्टी यांच्यासह लहरी युवा मंचचे सदस्य, संस्थानचे सचिव गोविंद मेश्राम, खजिनदार गोपाल माटे, विश्वस्त मंडळाचे सदस्य संजय तराळ, दीपक कुन्दनानी, विजय सातपुडे, नंदकिशोर सहारे आदी प्रयत्नशील आहे.

# शेतकऱ्यांचा अर्थवाद हरला!,धर्मवाद जिंकला?

विधानसभा निवडणुकीचा सारीपाट ज्या पद्धतीने जिंकला गेला, आता त्याच व्यवस्थेवर, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजायला लागलेत. मतदारांनी, वैयक्तिक कुवतीप्रमाणे, स्वतःचे विचारधारवर मतदान केले. तर ते देशाच्या आर्थिक धोरणावर केले की, जाती-धर्मावर झाले? हे आता पूर्ण महाराष्ट्राने अनुभवले. देशाला सांभाळणारा दृष्टिकोन कोणता असेल, तर तो आर्थिक आणि व्यवहारिक दृष्टिकोनच तारणारा असतो? लोकशाही पद्धतीने निवडणुकीतून सिद्ध करण्यासाठी मतदान हा सामाजिक अधिकार दिला आहे. परंतु निवडणूक ही लोकतंत्र की, दबावतंत्र की, हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीयच राहिला. आज प्रत्येक कुटुंबात किमान एक -दोन तरी पद-वीधर आहेत, किमान त्यांना जगण्याची भाषा तरी कळते. ज्याना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, दृष्टिकोन समजतो. तो खरंच सुशिक्षित झाला असे वाटते काय? जेव्हा तो मतदान करतो, ते आपण स्व-हक्कासाठी करतो की, स्वतःचे जगण्यासाठी करतो की, आपल्या जातीतला-धर्मातला माणसाला निवडून देण्यासाठी करतो? या मानसिक गोंधळलेल्या परिस्थितीत तो नेहमी असतो. मग जाती-धर्मातल्या निवडून पाठविलेल्या उमेदवाराने आतापर्यंत मूलभूत हक्काचे, आर्थिक धोरणाचे, न्यायव्यवस्थेचे कायदे गरजे नुसार दुरुस्त करण्याचे काम कां केले नाही, आणि आणि सरळ व सुलभ पद्धतीने जगण्याचे प्रश्न, कां सोडविले नाही, हेच अजून मतदारांना कळले आहे की नाही ? मतदान करताना पहिला डोक्यात विचार येतो. तो उमेदवार कोण्या जातीचा? कोण्या धर्माचा आहे? आणि कोण्या पक्षाचा आहे. मग त्याच्या जातीचे मते किती? जाती धर्माचा प्रश्न डोक्यात घेऊन जर मतदान होत असेल तर भुकेच्या प्रश्नाचे उत्तरे जाती-धर्माच्या निवडणुकीत शोधता येईल काय? आणि भुकेचा प्रश्न तर आर्थिक धोरणाशिवाय कधीच सुटला नाही, आणि तो सुटणार ही नाही?

जातीच्या लढाया देशातील सत्तेतील राजेच लावतात, आणि त्यावर सर्रास निवडणुकी घेतल्या जातात. आणि हाऊस मध्ये निवडून गेल्यावर हेच नेते धर्मनिरपेक्षतेच्या शपथा घेतात. तेव्हा राज्यघटना कुठे झोपी जाते? निवडणुकीत तुम्ही किती भुलथापा दिल्यात, कसे जाहीरनामे प्रसिद्ध केले, याचा निवडून आल्यानंतर हाऊस मध्ये काहीही संबंध राहत नाही. जे जाती-धर्माचा प्रचार करून निवडून येतात त्यांनाच विधान भवन, लोकसभेत धर्मनिरपेक्ष म्हणून शपथ कां दिल्या जाते? त्यावेळेस हा उमेदवार कोणता प्रचार करून आला आणि कसा आला ? हे का शोधल्या जात नाही? धर्माची घाण ओकणारा उमेदवार विधान भवनं, व संसदेत गेल्याबरोबर धर्मनिरपेक्ष म्हणून एकदम शुद्ध होतो. ही तर शुद्ध फसवणूक आहे? यासाठी कायदे करणे व बदलविणे गरजेचे आहे? मांजर डोळे मिटून दूध पिते. अशीच न्याय रचना आहे कां? सत्तेतील धर्मांध व्यक्तीचा संबंध जगताना भुकेशी येतो? आणि भुकेचा प्रश्न, अन्न-धान्याशी येतो. म्हणजेच शेतीतून, अन्न धान्यातूनच तर आर्थिक व्यवस्था तयार होते? आणि या आर्थिक व्यवस्थेवर देशाचा कारभार चालतो? भारत देशातील नव्हेतर जगाच्या अर्थवादाची सुरवातच शेतीचा पहिला कारखाना उघडून तयार झाली. आणि राज्यकर्त्यांनी तो जगण्याचा अधिकारच जाती-धर्मात नेऊन टाकला? आणि मतदारांना तो अतिशय गोड वाटून त्यांनी सहकार्य केले? कारण त्या जाती-धर्माच्या व्यवस्थेला हाऊस मध्ये जाईपर्यंत समाजाने तोंडी मान्यता दिली? बऱ्याच आजी-माजी आमदार-मंत्र्यांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, शेतीतील आर्थिक स्वातंत्र्याच्या धोरणांचे अजूनही त्यांना आकलन नाही. हाऊस मध्ये या विषयाला बगल देणारे सर्व बैल भारती असतात. असेच माजी आमदाराचें चर्चेतून निष्पन्न झाले. त्यांना तर देश हिताचे दृष्टीने आर्थिक स्वातंत्र्याची ट्रेनिंग देणे गरजेचे आहे, हेच जाणवले. मतदार हा पोटातील आगीची लढाई सोडून, जातीची घोंगडी अंगावर घेवून जगतो आहे? हेच नुकत्याच झालेल्या निवडणुकीतून स्पष्ट झाले .



निवडणुकीच्या वेळेस हिंदू खत्रेमे है? तर, अनब मग निवडणूक झाल्यावर तो खतरेच्या बाहेर असतो कां? जर हिंदूंच्या देशात हिंदू खतरे मे है? मग सुरक्षित कोण आहे? भारत देशात ना पंतप्रधान सुरक्षित, ना जनता सुरक्षित? तर ही अस्थिरता माजवली कोणी? याचा सरळ अर्थ असे म्हणावे काय-महासत्तेची स्वप्न पाहणारा भारत देश, जाती धर्माची क्रांती करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडवीविनारा देश म्हटले तर आता वावगे होणार नाही. ? म्हणजे देशाला बलशाली, हा धर्मवाद करतो की, अर्थवाद करतो? हेच लोकशाहीत मतदारांना कळले नाही. म्हणजेच स्वतःच्या जगण्याचा अधिकार सोडून, स्वतःच्या शेतीमालाच्या भावाचा व शेतीचा प्रश्न सोडून राज्यकर्तेच्या गुलामगिरीत तो अजूनही जगतो आहे .

म्हणतात ना --- घरक्या रोट्या खाओ, और मामूक्या बकऱ्या चराओ?

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी धर्मवाद बाजूला करून, सुलभ पद्धतीने जगण्यासाठी ग्रामीण अर्थवाद ग्रामगितेतून मांडला. तर त्याचा कधी देशात विचारच झाला नाही आणि मतदारांनी सुध्दा कधीच अर्थवादी धोरणावर मतदान केले नाही?. ज्या चळवळीतून शरद जोशी या ब्राम्हणाने ओबीसी वर्गाला फुले- शाहू-आंबेडकराची अर्थवादी चळवळ समजून सांगितली, व प्रत्यक्ष लाखो शेतकरी एकत्र करून आंदोलनातून ती वस्तुस्थिती शिकवली. ती चळवळच जाती- धर्माच्या नेत्यांनी मोडून काढली. आणि आता तर शेतकऱ्यांचे पक्षच निस्तनाभूत करण्याचा सपाटा लावला? आणि मतदाराने सुध्दा नेत्याच्या मताने ऐकून जाती-धर्म वादच जोपासला अनब देशभर वाढवीला. म्हणूनच लाडकी बहिणीला सरकारच्या तिजोरीतील पैसे वाटावे लागले? शासकीय योजनेच्या नावावर डायरेक्ट खात्यावर पैसे पाठवून लोकमत तयार करन्यासाठी भिकारवाद जोपासल्या गेला. रुग्णांना, विधवांना, निराधार लोकांना, अपंगांना तिजोरीतील पैसे वाटपाचा कार्यक्रम म्हणजेच सरळ सरळ सरकार पैशाच्या जोरावर मते विकत घेतो. लोकमत विकत घेउन, लाचारीच्या खाली ढकलण्याचे दबावतंत्र वापरल्या जात आहे. शेतकऱ्यांना भीकवादी, अनुदान देऊन जगविण्याचा किळसवाणी प्रकार देशात चालू झाला.

शेतकऱ्यानी स्वतः पिकवलेल्या शेतमालाला उत्पादन खर्चानुसार रास्त भाव न देता, पिक विमा, अवकाळी पावसाची नुकसान भरपाई, कर्जमाफी किंवा अनुदानाच्या मार्गाने पैसे टाकून त्याला जगविण्याचे नाटक केल्या जात आहे. म्हणजे सरकार हेच एक नाटक कंपनी तयार झाली असे जनतेला दिसत आहे. आणि आमचेच सरकार परोपकारी कृपाळू व दयावंत आहे, आणि तो शेतकरी आमच्या सरकारच्या भरोशावर जिवंत आहे असे भासवल्या जाते, खरं तर यात जनतेला शुध्द फसविले जात आहे. तर मग धर्माचेच नावाने मतदाराचे व सर्वांचे पोट भरते, हे राज्यकर्ते कां सांगत नाही. धर्माचे नावाने उपाशा पोटी राहून जर पोटाची आग शांत होत असते, असे कोणत्या धर्माच्या ग्रंथात लिहिले आहे, हे पण सांगितले पाहिजे ना ? आणि असे झाले तर मग शेतकऱ्यांना शेतीतून अधिक उत्पादन काढण्याची सल्ला सरकार कडून कां नेहमी दिल्या जाते?. फुले-शाहू-आंबेडकरांची अर्थवादी चळवळ खलास करण्याचे डावपेच कां आखले जातात? परंपरेनुसार धर्मशास्त्राची जोपासना करणे, पुरातन विचाराचे संस्कार वापरणे गैर नाही. पुर्वजानी दिलेले संस्कार हे आचरणाचे ध्येय होऊ शकते. धर्म परंपरा ही कौटुंबिक समस्या आहे. त्यातून मुक्त होणे हे सुद्धा कठीण आहे, याचा अर्थ असा आहे कां जातीधर्माचा प्रसार मतदानासाठी वापरणे हे मग योग्य आहे कां ? विधान भवन व संसदेत धर्मवाद चालत नाही तर आर्थिक धोरणे चालतात. पण निवडणुकीत अर्थवादाचे मूळच जाळून टाकल्या जाते अनब भिकारचोट आर्थिक धोरण वापरले जाते. जर पायाच मजबूत नसेल तर बिल्डिंग कोसळल्याशिवाय राहणार नाही.

प्रपंचासाठी व जगण्यासाठी तर आर्थिक घडामोडी जोपासणे गरजेचे असते. शासकीय तिजोरीच्या भरोशावर लाचारीने व भिकारीने मतदारांना जगविन्याची परंपरा सुरू झाली. मतदार हा सुद्धा स्वबळावर, स्वावलंबी होऊन जगण्याची लढाई सोडून, तो सुद्धा जातीची व धर्माची लढाई करायला निघाला. या धर्माचे लढाईला जगविणारा, त्यांच्या पोटात अन्न टाकणारा, त्यांना खाऊ घालणारा मात्र शेतकरी हरला. तो या व्यवस्थेशी दोन हात करताना हतबल झाला. सरकारने चुकीचे धोरणे वापरून जाणून बुजून तो हवालदिल केला. तो अजूनही हा देश पोसण्यासाठी सक्षम आहे. मात्र राज्यकर्त्यांनी त्याला चकणाचुर करून, जाणीव पूर्वक हरविला आहे. याला दोषीच मतदार आहे. कारण मतदारांना सुद्धा आर्थिक स्वातंत्र्याची भाषा अजून समजली नाही. त्यांना फक्त देश स्वतंत्र झाल एवढेच समजते? पण हक्काचे व न्यायाचे जगणेसाठी घटनेतील कायदे दुरुस्ती करून, भारतीय संविधानातूनच त्यांची गाडी पंचर केल्या गेली. हे सामान्यांना कसे कळेल? त्यांना हे कळले जाऊ नये म्हणून तर, जाती-धर्माची लढाई मतदारांच्या डोक्यात घुसविण्यात आली.

कारण याने स्वतःसाठी जगण्याचा अधिकार न वापरता, नेत्याचा आदेश वापरला? मानसिक गुलामी स्वीकारलेल्या मतदाराला, आर्थिक जगण्याची झळ सोसूनही त्याला अजून पर्यंत समजले नाही, असाच याचा अर्थ निघतो. काँग्रेस व बिजेपी या दोन्ही राजकीय पक्षांनी शेतकरी चळवळ संपविली, मूळ अर्थवाद संपविण्यासाठी खतपाणी घातले. तरी मतदारांनी त्यांनाच भरघोस मतांनी शिकके मारले. ही चूक अजूनही शेतकरी वर्गाला समजली नाही. कारण जाती-धर्माचे बोझ्याखाली, ती त्याला समजुच दिली नाही. जातीचा नेता निवडण्यातच हयात गेली. संपूर्ण आयुष्य बरबाद झाले. शेतकरी म्हणून आणि माझ्या हक्काच्या शेती प्रश्नावर कधी त्याने मतदानच केले नाही, तर मग शेतकरी प्रश्न सुटणार कसे? तो जाती-धर्माच्या मानसिक गुलामितच जगला आणि वाढला. त्याने आर्थिक गुलामीची झळ सोसली पण नेत्याचे भरवश्यावर गुलामी पत्करून तो जगत राहिला. हा संपूर्ण दोष व्यस्थेचाच आहे. शेतकरी समाज मानसिक गुलामीचा शिकार केल्या गेला. जबरदस्तीने तसा तो बनविला, जनतेनीच त्याला मतदानातून हद्दपार केला. बळीराजा, पोशिंदा, शेतकरी राजा, म्हणून वाजविला तुझा आता बाजा, अन अटकली खुटी तर, जाशील कुठी. अशी अवस्था आणून ठेवली. जनतेचा उद्धार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पक्ष व शेतकरी नेते संपविणे हेच काँग्रेस, बीजेपीचे ध्येय आहे. कारण दोन्ही पक्षांची भूमिकाच जातीयवादि नेते निर्माण करण्याची आहे. आणि या समस्येला जनता बळी पडत आहे. कारण ती मतदारांमध्ये अजूनही तशी जागृती नाही. म्हणजे या व्यवस्थेला खतपाणी घालणारे, व मतदान करणारे नागरिक सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत. आता तर जातीव्यवस्था वाढवून शेतकरी अवस्था खलास करून, या पापाचे धनी बनून व मानसिक गुलामीत जगनारेच मतदार तयार झालेत काय,असे वाटते? आता तरी पुढील घडामोडीसाठी, विचार करून परिवर्तन करण्याची गरज निर्माण झाली आहे? शरद जोशी म्हणतात -- ना जात, ना पात, ना प्रांत, ना पक्ष, किसान बचाव एकही लक्ष.

**धनंजय पाटील काकडे**

९८९०३६८०५८, मुक्काम-वडूरा, पोस्ट- शिराळा, तालुका-चांदूरबाजार, जिल्हा-अमरावती

# जिल्ह्यातील १२९ शाळांत एकाच दिवशी होणार परखचे राष्ट्रीय सर्वेक्षण

## ४ डिसेंबर रोजी तिसरी, सहावी व नववीतील विद्यार्थ्यांची चाचणी, १३७ वर्गाचे होणार सर्वेक्षण

**गोंदिया:** जिल्ह्यातील १२९ शाळांत परख चे राष्ट्रीय सर्वेक्षण होणार आहे. निवडलेल्या शाळांतील तिसरी, सहावी व नववीतील सर्व माध्यमांतील विद्यार्थ्यांची चाचणी ४ डिसेंबर रोजी एकाच दिवशी घेण्यात येणार असल्याची माहिती डाएटचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य यांनी दिली. या चाचणीसाठी निवडलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती शंभर टक्के असणे आवश्यक राहणार आहे. परीक्षांसाठी क्षेत्रीय अन्वेषक व निरीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तिसरीसाठी दोन क्षेत्रीय अन्वेषक, सहावी व नव्वीसाठी प्रत्येकी एक क्षेत्रीय अन्वेषक राहणार आहे.

जिल्ह्याची गुणवत्ता वाढावी यासाठी हे परख राष्ट्रीय सर्वेक्षण करण्यात येत आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) यांच्या वेबसाइटवर चाचणीबाबत सरावासाठी प्रश्नपेढ्या, पॅटचे पेपर उपलब्ध करुन देण्यात




**परख राष्ट्रीय सर्वेक्षणासाठी जिल्ह्यातील १२९ शाळांची निवड करण्यात आली आहे. या निवडलेल्या शाळांतील तिसरी, सहावी व नववीतील विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात येणार आहे. या राष्ट्रीय परख सर्वेक्षणाबाबत शाळांना कळविण्यात आले आहे. १२९ शाळांमधील १३७ वर्गाचे एकाच दिवशी सर्वेक्षण होणार आहे.**

**डॉ.नरेश वैद्य, प्राचार्य, डायट गोंदिया**

आले आहेत. या सर्वेक्षणासाठी निवडलेल्या १२१ शाळांत ४ डिसेंबर रोजी एकच दिवशी ही चाचणी घेण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी एनसीईआरटी (नवी दिल्ली) यांनी यादृच्छिक शाळा निवडलेल्या आहेत. ४ डिसेंबर रोजी इयत्ता तिसरीसाठी सकाळी ११ ते १२.३० वाजतापर्यंत, नव्वीसाठी सकाळी ११ ते दुपारी १ वाजता दरम्यान ही चाचणी घेण्यात येणार आहे. २ ते ४ वाजतापर्यंत शिक्षक प्रश्नावली, शाळा प्रश्नावली व विद्यार्थी प्रश्नावली पूर्ण करुन घेण्यात येणार आहे. तसेच संध्याकाळी ४ ते ६ वाजता दरम्यान सर्व सर्वेक्षण साहित्य निरीक्षकांकडे जमा करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी निवडलेल्या शाळांना याबाबत गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे. विशेष गरज असणाऱ्या मुलांची शाळा या सर्वेक्षणासाठी निवडली गेली असेल तर त्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. शाळांचे माध्यम व सर्वेक्षणाकरिता निश्चित करण्यात आलेल्या माध्यमात बदल असेल तर अशा शाळेत सर्वेक्षणावेळी क्षेत्रीय अन्वेषकांना या विद्यार्थ्यांना प्रश्नांचे अर्थ समजावून देण्यापर्यंत मदत करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाच्या कालावधीत राष्ट्रीय व राज्यस्तरावरुन अधिकारी शाळांना भेटी देणार आ–हेत. तसेच जिल्हास्तरावरुनही जिल्हास्तरीय अधिकारी शाळांना भेटी देणार आहेत.

### सर्वेक्षणात या शाळांचा समावेश

**परख सर्वेक्षणात गोंदिया तालुक्यातील ४६ शाळा, आमगाव तालुक्यातील सहा शाळा, सालेकसा तालुक्यातील आठ शाळा, देवरी तालुक्यातील १४ शाळा, सडक अर्जुनी तालुक्यातील सहा शाळा, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील २० शाळा, गोरेगाव तालुक्यातील १३ शाळा व तिरोडा तालुक्यातील १६ शाळांचा समावेश आहे.**

### तिसरी ४५, सहावीसाठी ५१ तर नववीसाठी ६० प्रश्न

**परखच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात तिसरीसाठी पायाभूत स्तराचा शेवट, पायाभूत स्तर अखेर क्षमतेचे सर्वेक्षण करणे तसेच ४५ प्रश्न व ९० मिनीटांची ही चाचणी राहणार आहे. सहावीसाठी ५१ प्रश्न व परीक्षेसाठी ९० मिनिटे परीक्षेचा कालावधी राहणार आहे. तर नववीसाठी मध्य स्तराचा शेवट मध्यस्थ अखेर क्षमतेचे सर्वेक्षण करणे. ही चाचणी ६० प्रश्नांची असणार असून, यासाठी १२० मिनिटांचा कालावधी विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. या परीक्षेची तयारी शिक्षण विभागाने पूर्ण केली आहे. येत्या ४ डिसेंबर रोजी ही परीक्षा जिल्ह्यतील १३७ शाळांमध्ये एकाच दिवशी घेतली जाणार आहे.**

# सर्वाधिक मताधिक्याचे रेकार्ड विनोद अग्रवाल यांच्याच नावावर

## ६१ हजार मतांनी मिळविला विजय, चुरशीच्या लढतीत दुसऱ्यांदा मारली बाजी

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे आमदार विन–ोद अग्रवाल यांनी सर्वाधिक मातधिक्याने विजय मिळविला आहे. जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीतील इतिहासात हा त्यांचा रेकॉर्ड नोंदविला जाईल. तब्बल ६१ हजार ४६४ मतांनी विजयी होण्याचा मान त्यांनी मिळविला आहे. सन २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी २७ हजार ९०१ इतके मताधिक्य घेतले होते.



यंदा जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील निवडणूक अत्यंत चुरशीची होती. निवडणुकीत दोन विद्यमान व तीन माजी आमदारांच्या भवितव्याचा फैसला होणार होता. मात्र गोंदिया विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार विनोद अग्रवाल व माजी आमदार गोपालदास अग्रवाल या दोन दिग्गजांची लढत असल्याने अवघ्या राज्याच्याही नजरा या लढतीकडे लागून होत्या. विशेष म्हणजे सन २०१९ च्या निवडणुकीत विनोद अग्रवाल यांनी अपक्ष उमेदवार असूनही भाजपचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांना २७ हजार ९०१ मतांनी पराजित केले होते.

यंदा विनोद अग्रवाल भाजपकडून तर गोपालदास अग्रवाल काँग्रेसच्या तिकीटावरुन लढले. मात्र, विनोद अग्रवाल यांनी त्यांना यंदाही मात दिली व विजयाची माळ काढून घेतली. यंदा विनोद अग्रवाल यांनी सर्वाधिक तब्बल ६१ हजार ४६४ मतांनी गोपालदास अग्रवाल यांना मात दिली आहे.

गोंदिया जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात विनोद अग्रवाल यांनी हे सर्वाधिक मताधिक्य मिळविले असून हा त्यांना रेकॉर्ड ठरला आहे. त्या खालोखाल ४२ हजार ८४१ मताधिक्य घेत तिरोडा मतदारसंघातील भाजपचे आमदार विजय रहांगडाले विजयी झाले आहे.

### बडोले यांचा रेकॉर्ड केला ब्रेक



**सन २०१४ च्या निवडणुकीत अर्जुनी–मोरगाव विधानसभा मतदारसंघातून भाजपचे राजकुमार बडोले यांनी काँग्रेसचे उमेदवार राजेश नंदागवळी यांना तब्बल ३० हजार २९५ मतांनी पराजित केले होते. जिल्ह्यात एवढ्या मताधिक्याचा हा रेकॉर्ड बडोले यांच्या नाव–ावर होता. मात्र यंदाच्या निवडणुकीत विनोद अग्रवाल यांनी त्यांचा हा रेकॉर्ड ब्रेक केला आहे. यंदा त्यांनी ६१ हजार ४६४ एवढे मताधिक्य मिळविले आहे.**

### सर्वाधिक मताधिक्य

२०२४– विनोद अग्रवाल (गोंदिया) ६१,४६४

२०१९– विनोद अग्रवाल (गोंदिया) २७,९०९

२०१४– राजकुमार बडोले (अर्जुनी मोरगाव) ३०,२९५

### कमी मतांनी पराभूत

२००९–डॉ. सुशील रहांगडाले (तिरोडा) ६२३

२००४–नरेश माहेश्वरी (आमगाव) ५९६

२०१९–राजकुमार बडोले (अर्जुनी मोरगाव) ७१८

### माहेश्वरी ठरले कमनशिबी

**सर्वाधिक मताधिक्याचे रेकॉर्ड यंदा विनोद अग्रवाल यांनी आपल्या नावावर करुन घेतले असतानाच सर्वात कमी मतांनी पराजित झाल्याचा रेकॉर्ड आमगाव विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार नरेश माहेश्वरी यांच्या नावावर आहे. सन २००४ च्या निवडणुकीत त्यांना भाजपचे भेरसिंग नागपुरे यांनी मोजक्या ५९६ मतांनी पराभूत केले होते. तसेच २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहर चंद्रीकापुरे यांनी भाजपचे राजकुमार बडोले यांना ७१८ मतांनी पराजित केले होते. तर २००९ च्या निवडणुकीत भाजपचे डॉ. खुशाल बोपचे यांनी राष्ट्रवादीचे डॉ. सुशील रहांगडाले यांना फक्त ६२३ मतांनी पराजित केले होते.**

# धर्मादाय चे सर्व्हर डाऊनच

## दोन महिन्यांपासून कामकाज पडले ठप्प, राज्यभरातील स्थिती गंभीर

**गोंदिया:–** राज्यभरातील धर्मादाय उपायुक्त कार्यालयातील सर्व्हर डाऊन झाल्याने गत महिनाभरापासून न्यासांची नोंदणी, हिशेबपत्रकांचे कामकाज ठप्प झाले आहे. या अडचणींमुळे पक्षकार, वकील व न्यासांच्या नोंदणीसह विविध कामकाजांसाठी आलेल्या नागरिकांना मनस्ताप होत आहे.

गोंदियातील धर्मादाय उपायुक्त कार्यालयात महिन्याला किमान १० ते १५ न्यासांची नोंदणी होते व शेकडोवर हिशेपत्रके सादर होतात. अशात महिनाभर सर्व्हर डाऊन असूनही तो कशामुळे डाऊन झाला याचे कोडे उलगडलेले नाही. तांत्रिक अडचण असल्याचे कारण सांगितले जात आहे. लोक एकदम हिशेबपत्रके सादर करीत असल्यानेही ही समस्या निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. लोकहितासाठी काम करीत असलेल्या सभासद असलेल्या सार्वजनिक संस्था, संघटना, मंडळांचे कामकाज धर्मादाय



कार्यालयांतर्गत येते. अशा सर्व संस्थांची नोंदणी करणे, त्यचे वर्षाला नूतनीकरण करणे, दरवर्षी लेखा–परीक्षण सादर करणे, हिशेबपत्रके सादर करणे ही सर्व कामे धर्मादाय कार्यालयांतर्गत केली जातात. मात्र दिवाळीपासून या कार्यालयाच्या सर्व्हरमध्ये मोठा तांत्रिक बिघाड झाला आहे. सकाळी ९–१० वाजता कामकाज सुरु झाले की, सर्व्हर डाऊनचा बिकट प्रश्न उभा होतो, तो दिवसभर अशाच असतो. सायंकाळी ५ वाजेनंतर सर्व्हर जरा वेग पकडतो. तोपर्यंत कार्यालयाची वेळ संपते. हे गत महिनाभर म्हणजे दिवाळीपासून सुरु आहे.सार्वजनिक संस्थांच्या वेगवेगळ्या कामासाठी अनेक पक्षकार, वकील, नागरिक कार्यालयात येतात. अने जण परगावातून आलेले असतात. मात्र येथे आल्यावर त्यांना हेलपाटे मारावे लागतात.

### हिशेबपत्रकांसाठी दिली मुदतवाढ

**सार्वजनिक संस्थांचे आर्थिक वर्ष मार्च महिन्यात संपते. त्यानंतर पुढील सहा महिन्यांत त्यांनी हिशेबपत्रके सादर करणे व त्याचे प्रमाणपत्र धर्मादाय कार्यालयाकडून घेणे बंधनकारक असते. मात्र सर्व्हर डाऊनमुळे हे काम थांबले आहे. अखेर कार्यालयाने त्यासाठी संस्थांना डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.**

### मुंबई कार्यालयाकडे पाठपुरावा

**याबाबत धर्मादाय उपायुक्त कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनी सर्व्हर डाऊनची वस्तुस्थिती मान्य केली. हे कार्यालय शासनाधिस्त असल्याने हा प्रश्न मंत्रालयातूनच सोडविला जाणे अपेक्षित आहे. याबाबत मुंबईत पाठपुरावा सुरु आहे. परंतु अजून त्याला यश आलेले नाही. पुढील आठवड्यापासून कदाचित यंत्रणा सुरळीत होऊ शकेल, अशी माहिती कर्मचाऱ्यांनी दिली.**

### बिबट्याच्या हल्ल्यात ३ वर्षीय मुलगा गंभीर जखमी,उपचार सुरू

**गोठणगाव** – गोठणगाव येथे घडलेल्या धक्कादायक घटनेत बिबट्याच्या हल्ल्यात एक ३ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना १ डिसेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता घडली. मुदुल रुपेश नंदेश्वर (वय ३ वर्षे) हा आपल्या आई–वडिलांसोबत गोठगाव येथे मंडई निमित्त आला होता आणि अंगणात खेळत असताना बिबट्याने अचानक त्याच्यावर हल्ला केला.
मुलाच्या वडिलांनी चित्कार ऐकताच तत्काळ मुलाकडे धाव घेतली. त्यांनी बिबट्याला हाकलून लावले,मात्र बिबट्याने पुन्हा हल्ला चढवला. मुलाच्या वडिलांनी मोठ्या धाडसाने बिबट्याला दुसऱ्यांदा दूर केले. त्यानंतर मुलाला तातडीने गोठणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. डॉक्टरांनी मुलाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगून त्याला पुढील उपचारांसाठी अर्जुनी मोरगाव ग्रामीण रुग्णालयात हलवले.सध्या मुलावर उपचार सुरू असून, त्याची प्रकृती हळूहळू सु–धारत असल्याचे त्याच्या वडिलांनी सांगितले

# ४२४ रक्तदात्यांनी रक्तदानाचे केले पुण्यकार्य

**गोंदिया:** जिल्ह्यातील नक्षलग्रस्त प्रभावित भागात नक्षल विरोधी अभियान राबवित असताना नक्षली हल्ल्यात शहीद झालेले पो–लीस दलातील पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार त्याचप्रमाणे मुंबई शहर येथे आंतकी हल्ल्यात शहीद झालेले पोलिस अधिकारी, अंमलदार, निष्पाप नागरिक यांच्या स्मृती प्रित्यर्थ ४२४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

पोलिस अधीक्षक गोरख भामरे व अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, आमगाव उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मडामे, रोहिणी बानकर, विवेक पाटील, साहिल झरकर यांच्या मार्गदर्शनात २६ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील जिल्हा वाहतूक शाखा, पोलिस उपम ुख्यालय देवरी, आमगाव पोलिस, तिरोडा पोलिस, सालेकसा पोलिस, अर्जुनी मोरगाव पोलिस, डुग्गीपार पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबिर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या शिबिरात जिल्हा वाह–तूक शाखेचे ३९, देवरी पोलिस उपमुख्यालयाचे ७८, आमगाव पोलिस स्टेशनचे ७६, अर्जुनी मोरगाव पोलिस स्टेशनचे ४४, सालेकसा पोलिस स्टेशनचे ८२, तिरोडा पोलिस स्टेशनचे ३४ व डुग्गीपार पोलिस स्टेशनचे ७१ अश्याप्रकारे जिल्ह्यातील ४२४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार, सामान्य नागरिक, युवक युवती, एचडीएफ्फसी बँकेच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.



आयोजनासाठी एचडीएफसी बँकेचे दीपक पाटील, सुमित करमनकर, डॉ. पल्लवी चौरागडे, लोकमान्य ब्लड सेंटर गोंदिया येथील चेतन चव्हाण, रंजना मेश्राम, खुशबू चांदेकर, पल्लवी पटले, सचिन सावरकर, रोहित बागडे, यांनी परिश्रम घेतले.

# संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षा पुरस्कार वितरण व संविधान दिन कार्यक्रम उत्साहात




**गोंदिया:–** हर घर संविधानङ्क जागृती अभियान अंतर्गत मागील ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आलेल्या संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षेचे पुरस्कार वितरण कार्यक्रम तसेच संविधान दिन समारोह विनोद मोहतुरे (सहायक आयुक्त, समाज कल्याण गोंदिया) यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा.डॉ.दिशा गेडाम (समन्वयक संविधान जागृती अभियान), रमेश बिजेकर (शिक्षण तज्ञ), वसंत गवळी (ज्येष्ठ नागरिक), खेमेंद्र कटरे (सयोंजक ओबीसी अधिकार मंच), कैलाश भेलावे (ओबीसी सेवा संघ कृती समिती), शीतल अंबादे (मुख्याध्यापिका) यांच्या प्रमुख उपस्थितीत सामाजिक न्याय भवन येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, संविधान मैत्री संघ व विविध सर्व सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

या प्रसंगी अध्यक्षीय संभाषणात सहायक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी संविधानाचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे असल्याचे विचार व्यक्त केले. तर उपस्थित मार्गदर्शक मंडळाने भारतीय संविधानाच्या गौरवशाली ७५व्या वर्षात पदार्पण निमित्त २६ नोव्हेंबर २०२४ संविधान दिन ते २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनाला भारतीय संविधानाचे अमृत महोत्सव साजरे करतो आहोत. संविधान निर्मात्यांनी अतिशय कष्टाने देश घडविण्यासाठी निर्माण केलेल्या भारतीय संविधानातील समाविष्ट स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, गणराज्य प्रस्थायी करायचे आहे.

## ७५वा गौरवशाली संविधान दिवस व समारोह

या मुलभूत नऊ तत्वांची वर्तमानात मोठ्या प्रमाणावर लोकजागृती, प्रचार–प्रसार मोठ्या प्रमाणात करून स्वातंत्र्य– समता–बंधुता–धर्मनिरपेक्षता या मुलभूत लोकशाही तत्व मूल्यांची जपणूक करणे, संविधान संस्कृतीला आ–चरणात आणून राष्ट्रनिर्मिती करिता समर्पित असणाऱ्या महापुरुषांचा वैचारिक वारसा अबाधित ठेवणे गरजेचे आहे असे सांगितले. यावेळी रमेश बिजेकर, खेमेंद्र कटरे आदींनी विचार व्यक्त केले. प्रास्तविक प्रा.दिशा गेडाम यांनी केले.

जिल्ह्यातील ८ ही तालुक्यात विद्यार्थी, शिक्षक व पालक वर्गात संविधान जागृती अभियान यशस्वी करण्यासाठी गोंदिया जिल्हास्तरीय संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षा –२०२४ चे आयोजन मागील ऑक्टोबर महिन्यात जिल्ह्यातील १०० शाळा महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्यात आले होते. या परीक्षेचे पुरस्कार वितरण या प्रसंगी सहायक आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले. जवळपास ७ हजार विद्यार्थ्यांनी या परीक्षेत भाग घेतले होते. १८ वर्षा खालील व १८ वर्षावरील अशा ज्युनिअर आणि सिनियरचे २ वयोगट होते. त्यात प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे तालुकानिहाय पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

**देवरी तालुका–** ज्युनिअर गट जान्हवी शामल सुखदेवे, महक नरेश चंदनमलागर, कामनी राजकुमार नेताम, सिनियर गट – अंशुल संदेश लांजेवार, रिंकु सिद्धार्थ बडोले, विकेश सदाशिव बिसेन

**अर्जुनी मोरगाव तालुका** – ज्युनिअर गट– रज्जत तेजराम कांबळे, तुपल सौरभ शहारे, अनुज गौतम नंदेश्वर, सिनियर गट– दिपक भारत बेलखोडे, कुणाल अनिल बोरकर, आकांक्षा राजकुमार शेंडे,

**सडक अर्जुनी तालुका** – ज्युनिअर गट– आस्था संजय दहिवले, सुहानी पुरुषोत्तम विठोले, शुभम सुभाष पुराम, सिनियर गट– पौर्णिमा विलास बनसोड, श्वेता कुलदीप इलमकर, शीतल विलास डोमळे

**सालेकसा तालुका** – ज्युनिअर गट – प्राची महेश भगत, समिर नुवरलाल तुरकर, रिव्यानी विनोद वाघमारे, सिनियर गट – अर्चना केवलचंद मेश्राम, शालीनी राधेश्याम मरस्कोल्हे, प्रणिता ओमप्रकाश येळे

**तिरोडा तालुका** – ज्युनिअर गट उद्धोग हेमराज कोडापे, स्वप्न–ील अनिरुद्ध ठाकरे, तेजस्वी राजेश शेंडे, सिनियर गट रजनी राजेश बाणासुरे, रोहीणी पवन मेश्राम, सुरजलाल गुलाब कोडवती

**आमगाव तालुका** – ज्युनिअर गट सुरभी नन्नीलाल रहांगडाले, रेखा मनोज हरिणखेडे, वेदीका पुरुषोत्तम कटरे, सिनियर गट – म निषा इंद्रराज बोपचे, अंजली महेश मडामे, शिल्पा रामेश्वर मेश्राम

**गोरेगाव तालुका** – ज्युनिअर गट –सुशिल धनराज कटरे, वैष्णवी तुलाराम जगणीत, अमन कुंवरलाल हरिणखेडे , सिनियर गट –सलोनी गुणेश्वर ठाकरे, यामिनी राजु ढोरे, सरिता संजय बारेकर

**गोंदिया तालुका** – ज्युनिअर गट दिव्या श्री चौव्हान, धनश्री झनकलाल राऊत, हेमंत गोवर्धन लाडे , सिनियर गट –शबनम आबीद अली सैय्यद, दर्शन परसराम भर्रे, प्रविण अशोक कानसकर या प्रमुख विजेत्यांसह, १३० प्रोत्साहन पुरस्कार विजेत्यांना १.५ (दीड) लाखांचे नगद, शालेय साहित्य, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जवळपास २०० पुरस्कार जिल्हयातील ८ ही तालुक्यात समान स्वरूपात स्मृतिचिन्ह व प्रम ाणपत्रासह वितरीत करण्यात आले. विजेत्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थी, शाळा महाविद्यालय प्रशासन, पालक वर्ग सामाजिक न्याय भवन येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एस.सी., एस.टी.चे वर्गीकरण हा आरक्षण संपविण्याचा डाव–डॉ.प्रदीप मेश्राम

**अर्जुनी मोरगाव:–** अनुसूचित जाती – जमातीचे प्रवर्गाच्या अंतर्गत जातीनिहाय वर्गीकरण हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आर–क्षणाचे हक्कदार असणाऱ्यांचे आरक्षण काढून घेऊन ते खुल्या प्रवर्गातील लोकांना देण्याचे षडयंत्र असल्याचे मत जे.एम.पटेल कॉलेज भंडाराचे प्रा. डॉ. प्रदीप मेश्राम यांनी व्यक्त केले.

ते तालुकास्तरीय संविधान सम ारोह समितीच्या वतीने अर्जुनी– मोर. येथे आयोजित कार्यक्रमात बोलत हो–ते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बुध्द, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विर भगवान बिरसा मुंडा व अन्य महामानवांची पूजा करून संविधानाच्या सामूहिक उद्देशिकेच्या वाचनाने करण्यात आली. उद्देशिकेचे वाचन प्रदीप खोब्रागडे यांनी केले.

पुढे बोलतांना प्रा.प्रदिप मेश्राम म्हणाले संविधानात प्रवर्गाला आरक्षण दिले आहे, जातीला नाही. त्यामुळे एस.सी., एस.टी. प्रवर्गातील सर्व जातीत प्रवर्गाच्या आधारावर आरक्षण असल्यामुळे ते प्रवर्गाच्या आध–ारावर संघटित होत होते, त्यांच्यात बंधुत्वाची भावना निर्माण होत होती. प्रवर्गाच्या अंतर्गत जातीच्या आधारावर आरक्षण देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यामुळे एस.सी., एस.टी. प्रवर्गातील बंधुतेची व संघटनेची भावना लोप होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

विचार मंचावर संविधान समारोह समितीचे अध्यक्ष सोनदासजी गणवीर हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्ते म्हणुन डॉ. कविता मते , भगवानजी मुंडे , संयोजक यशवंत सोनटक्के, बाळूजी नेवारे, लक्ष्मीकांत मडावी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणवीर, शालीकराम सहारे, नगरसेविका शील–ाताई उईके, पंचायत समिती सभापती



सविताताई कोडापे, पंचायत समिती सदस्य भाग्यश्री सयाम हे मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी डॉ.प्रा.कविता मते,भगवान भोंडे यांनीही यांनी आपले विचार व्यक्त करतांना राष्ट्राचा विकास आणि समाजाचा विकास आणि भवितव्य हे संविधानाचे अंमलबजावणीशी जुळलेले आहे. म्हणून संविधान हे आपल्या सर्वांगीण प्रगतीचा दस्तऐवज आहे. दुसऱ्या विश्व युद्धानंतर अनेक देशाने आपले संविधान निर्माण केले. त्यातील काही रखडत रखडत चालत आहेत. तर काही आज अस्तित्वात नाहीत. जेव्हा की भारतीय संविधानाने अनेक संकटांना मात देऊन आपल्या सोबतच राष्ट्राचे अस्तित्व व एकसंघत्व टिकवून ठेवणे हे संविधान गतिमान आणि सक्षम होण्याचे स्वयं सिद्ध प्रमाण आहे. भारतीय संविधानामुळे भारत देश आज प्रगतीपथावर जात आहे. त्यामुळे तमाम भारतीयांनी भारतीय संविधानाचे मूल्य जोपासणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्षीय भाषणात बौध्द धम्माचे गाढे अभ्यासक व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनदास गणवीर यांनी भारतिय संविधान म्हणजे प्रत्येक भारतियांचे प्रगतीचे माध्यम आहे. देशातील तमाम बहुजन मागासवर्गीय समाजातील नागरीकांचे उज्वल भविष्य संविधानातच दडलेले आहे. भारता–तील प्रत्येक नागरिक हा संविधानाचे उद्देश नागरिकांचे कर्तव्य अधिकार इत्यादी बाबतीत जागरूक असला पाहिजे. अन्यथा वास्तविक लोकशाही स्थापित होणार नाही. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाला तालुक्यातील अनुसूचित जाती,जमाती व ओबीसी प्रवर्गातील हजारो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप खोब्रागडे, डॉ. प्रदीप भानसे, प्रभुदास मेश्राम, महेंद्र नंदागवळी, सत्पुरुष शहारे, नागेंद्र खोब्रागडे, सोनदास गणवीर यांनी कठोर परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन अमरदीप मेश्राम व किरणताई शहारे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार पुनाराम झगझापे यांनी मानले. शेवटी सर्व उपस्थितांना अल्पोहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


# ग्राम पंचायत कार्यालय दासगांव बु.

## पं.स.गोंदिया, जि.प.गोंदिया

## निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ सन २०२४-२०२५)

जा.क्र.६४५ दि.:–०२/१२/२०२४

ग्राम पंचायत दासगांव बु.अंतर्गत खालील बांधकामांची मोहोरबंद निविदा ब–१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग जि.प.गोंदिया यांच्या कडे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्राम पंचायत कार्यालय दासगाव (बु.) कडून देण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | निविदा व फॉर्मची किंमत | निविदेसोबत भरावयाची रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बंदिस्त गटारे बांधकाम | ५००००० | १०००/– | ४०००/– | ३ महिने | वर्ग ७ व त्या खालील |

| | |
|---|---|
| निविदा प्रकाशित दिनांक | दिनांक ०२/१२/२०२४ |
| कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | दिनांक ०३/१२/२०२४ सकाळी ११.०० वाजेपासून |
| निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | दिनांक ०३/१२/२०२४ पासून |
| निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १०/१२/२०२४ दु.०२.०० वाजे पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक १०/१२/२०२४ दु.०३.०० वाजे (शक्य झाल्यास) |

(टिप :– निविदा पत्रकातील सविस्तर माहिती ग्राम पंचायत कार्यालय दासगांव बु. येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.)

**(ओ.के.रहांगडाले)**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्राम पंचायत दासगांव (बु.)

**राणुताई दिनेश तुरकर**
सरपंच
ग्राम पंचायत दासगांव (बु.)

# शिवशाही बसचा भीषण अपघात,११ प्रवासी ठार,मृतकांच्या नातेवाइकांना १२ लाखाची मदत

**गोंदिया :-** सडक/अर्जुनी, कोहमारा मार्गे गोंदियाला जात असलेल्या शिवशाही बसला झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांची संख्या ११ वर गेली आहे.तर २९ प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करुन त्यांना घरी पोचविण्यात आले आहे. या घटनेने गोंदिया जिल्हा हादरला असून काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी महामंडळाकडून मृतकांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची व प्रधानमंत्री कार्यालयाकडून २ लाखाची मदत जाहीर केली आहे.



शिवशाही बसचा अपघात घडल्यानंतर घटनास्थळावर मोठा जमाव जमला. प्रवाशांच्या आक्रोशान अनेक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र अपघात घडल्यानंतर शिवशाही बसच्या चालकान घटनास्थळावरुन पळ काढला. पोलिसांनी जखमी प्रवाशांना जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल. घटनेनंतर पोलिस, एसटी महामंडळाचे अधिकारी, प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेत बसचे प्रवासी आणि प्रत्यक्षदर्शीकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. सर्वच यंत्रणाकडून चौकशी करण्यात आली. यात प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बसची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यात ही बस फारच वेगात असल्याचे समोर आले. बस अतिशय वेगात एकएक वाहनाला मागे टाकत जात असताना बस चालकाचे एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या नादात बसवरुन नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला उलटली. रस्त्याच्या कडेला लागलेली लोखंडी रेलिंगही बसमुळे तुटल्याची माहिती आरटीओ



अधिकाऱ्यांनी दिली. चालक भरधाव बस चालवीत असल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले असून चक्क ३५ मिनिटात दोन स्टॉप घेत ३० किमी अंतर कापले. ओव्हरटेकच्या नादात ही घटना घडल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून येत असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी म्हटले आहे.

गोंदिया जिल्ह्याच्या इतिहासातील सर्वांत मोठा हा अपघात असून, शुक्रवारचा दिवस काळा दिवस ठरला. सडक अर्जुनी तालुक्यातील कोहमारा ते गोंदिया हा वर्दळीचा मार्ग. या मार्गावर वाहने नेहमी सुसाट धावतात. वेगावर नियंत्रण नसते. कोहमारा ते मुंडीपारपर्यंत रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे किमान या ठिकाणी तरी वेग कमी असायला हवा. परंतु, चालक बेभान होऊन या मार्गावरून वाहने सुसाट पळवत असतात. परिणामी, लहान-मोठ्या घटना नेहमीच या मार्गावर घडतात. चालकांचा वाहन चालविण्याचा वेगच प्रवासी आणि सर्वसामान्यांच्या जीवावर उठला आहे. प्रशासकीय यंत्रणाही वाहनचालकांच्या मुसक्या आवळण्यात सपशेल अयशस्वी ठरली आहे. असेच वारंवार घडणाऱ्या घटनांवरून दिसून येते.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी ते गोंदिया मार्गावर खजरी-डव्वा गावाजवळ शिवशाही बस (क्रमांक एम.एच.०९ इ एम १२७३) उलटून अपघात झाला. या अपघातात मृतकांचा ११ वर गेला आहे. सुमारे २९ प्रवासी गंभीर जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडला. घटनास्थळावर रक्ताचा थारोळा पडल्याचे चित्र सर्वत्र होते. तर बसमधील प्रवासी ज्यांचा मृत्यू झाला, त्यापैकी कुणी बसमधून बाहेर फेकले गेले, तर कुणी बसमध्ये दाबले गेल्याचे भयावय चित्र होते. अपघात घडताच बसमधील इतर जखमी प्रवाशांना वाचविण्याकरीताचा टाहो ऐकताच आजूबाजूच्या शेतात असलेले नागरिक, ग्रामस्थ व राज्य महामार्गाने जाणाऱ्यांनी थांबत बसकडे धाव घेत आपल्या परीने जखमींना बसमधून बाहेर काढण्याचे प्रयत्न पोलिसांच्या येण्यापुर्वीच सुरु केले होते.

भंडारा-गोंदिया ही शिवशाही बस दुपारी भंडाऱ्याहून गोंदियाकडे येथे होती. बस चालकाने एका दुचाकीला ओव्हरटेक करताना त्याचे बसवरील नियंत्रण सुटले व ती उलटली. जवळपास २० फूट रस्त्यापासून बाजूला घासत गेली. त्यामुळे बसमधील ११ प्रवाशांचा मृत्यू व ३० प्रवासी जखमी झाले. मृतदेहाची उत्तरीय तपासणी करुन गोंदिया येथील शासकीय महाविद्यालयातून नातेवाईकांना सोपवण्यात आले असून गंभीर जखमींना गोंदिया शासकीय महाविद्यालयात उपचार करुन सोडण्यात आले.सडक अर्जुनी,गोरेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात तसेच डव्वा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काही प्रवाशांवर उपचार करुन त्यांना घरी पोचविण्यात आले.

## मुलीच्या भेटीला निघालेल्या दांपत्याचा मृत्यू



अपघातातील मृतांमध्ये साकोली तालुक्यातील चांदोरी (उसगाव) येथील कनोजे दांपत्याचा समावेश आहे. दोघेही डोंगरगड येथे मुलीच्या भेटीसाठी निघाले होते. मृतांची नावे रामचंद्र बबलू कनोजे (वय ६५) आणि अंजिरा रामचंद्र कनोजे (वय ६०) अशी आहेत. कनोजे दांपत्य डोंगरगड येथे राहणाऱ्या मुलीला भेटण्यासाठी गोंदियाला निघाले होते. परंतु, काळाने घात केला आणि अपघातात पती-पत्नीचा मृत्यू झाला.

## अनुकंपावर लागलेल्या स्मिताचाही बस अपघातात मृत्यू



अर्जुनी मोरगाव तालुक्यातील मोरगाव येथील रहिवासी असलेली स्मिता विक्की सुर्यवंशी,वय-३२ ही आज सकाळीच अर्जुनी मोरगाव वरुन बसने साकोली करिता निघाली. साकोलीवरुन गोंदिया येथील पोलीस मुख्यालयात नोकरीवर हजर होण्याकरीता ती भंडारा गोंदिया या शिवशाही बसने प्रवास करायला निघाली. मात्र आपला हा प्रवास अखेरचा ठरेल असे तिला कधीही वाटले नसेल. पतीच्या निधनानंतर पोलीस विभागात अनुकंपावर नोकरीला लागलेल्या स्मिताला १ मुलगा असून ती पतीच्या निधनानंतर सासु सासऱ्यांसोबतच राहत होती. या बस अपघातात मृत्यू पावलेली स्मिता सुर्यवंशीचे पती पोलीस विभागातच कार्यरत होते. त्यांचे यापूर्वीच आजाराने निधन झाले होते. त्यामुळे स्मिता सुर्यवंशीवर मोठा आघात झाला होता. आपले सासु सासरे व एका छोट्याशा बाळासह हलाखीचे जिवन जगत असताना स्मिताला पोलीस मुख्यालय गोंदिया येथे पोलीस शिपाई म्हणून अनुकंपा तत्वावर दोन तिन महिण्यापुर्वीच नोकरी मिळाली होती. आपले परिवारांना भेटुन स्मिता २९ नोव्हेंबरला आपल्या नोकरीवर जाण्यासाठी अर्जुनी मोर वरुन निघाली होती. तिच्या या अनाकलनीय मृत्यूने कुटुबियांवर शोककळा पसरली असून लहान मुल हे आईवडींला विना पोरकं झाले आहे.

## चालक निलंबित



गोंदिया-कोहमारा राज्य मार्गावर २९ नोव्हेंबरच्या दुपारी १२.२० च्या सुमारास डव्वा गावाजवळ शिवशाही एसटी बस उलटून ११ प्रवाशांचा मृत्यू, तर २९ प्रवासी जखमी झाले होते. या घटनेला कारणीभूत बसचालक प्रणय रायपूरकर (रा. भंडारा) याला डुग्गीपार पोलिसांनी अटक करीत शनिवारी न्यायालयात हजर केले होते. अधिक तपासाकरीता बसचालक रायपूरकर यास २ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. आता १६ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाने त्यास नोकरीतून निलबिंत केले आहे. बचचालकावर भारतीय न्याय सहिंता कलम १०५,१२५ (ए),१२५ (ब),२८१ सहकलम १८४,१३४,१७७ मोटारवाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## शिवशाहीचा प्रवास किती सुरक्षित

खजरीजवळ शिवशाही बसचा अपघात झाल्यानंतर शिवशाही बसेसच्या देखभाल, दुरुस्तीचा मुद्दा पुढे आला. अनेक शिवशाही बसेसची स्थिती बिकट आहे. पण यानंतरही त्या रस्त्यावरुन धावत आहेत. त्यामुळे यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा जीव कितपत सुरक्षित आहे. हा देखील प्रश्न या अपघातानंतर उपस्थित केला जात आहे.





## गावकरी मदतीला धावले

अपघाताची बातमी कळताच डव्वा येथील गावकऱ्यांनी अपघातस्थळी धाव घेत बसमध्ये अडकून पडलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. तसेच १०८ रुग्णवाहिका बोलावून त्यांना गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच डुग्गीपारचे पोलीस निरीक्षक पथकासह घटनास्थळी दाखल झाले व मदत कार्याला सुरुवात करीत जखमी व मृतकांची ओळख पटविण्याकरीता त्यांना चांगलीच दमछाक करावी लागली. भंडारा येथील विभागीय आगार नियंत्रकासह गोंदिया आगार प्रमुखांनी घटनास्थळाकडे धाव घेतली होती. घटना मोठी असल्याने जिल्हाप्रशासनासह सर्वच मदतीला लागले होते.

## काही काळ वाहतूक ठप्प, नंतर सुरळीत

दरम्यान भीषण अपघातामुळे गोंदिया-कोहमारा मार्गावरील वाहतूक काही काळापूर्ती ठप्प झाली होती. गोंदिया जिल्हा वाहतूक पोलिसांनी लगेच घटनास्थळी दाखल होत या मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या घटनेची माहिती मिळताच गोंदियाचे नवनिर्वाचित आमदार विनोद अग्रवाल माजी आमदार राजेंद्र जैन शासकीय महाविद्यालयात पोचून जखमींची विचारपूस केली, सोबत अपघातातील मृतकांच्या नातेवाईकाबद्दल माहिती घेतली.

## अरुंद रस्ते अपघातास कारणीभूत

गोंदिया कोहमारा या राज्यमार्गाच्या रुंदीकरणाला गेल्या तीनचार वर्षापूर्वीच मंजूरी मिळालेली आहे. मात्र वन व वन्यजीव कायदा पुढे करुन या रस्त्याचे रुंदीकरण थांबले आहे. त्यातच गोंदिया ते मुंडीपार पर्यंत मार्ग रुंदीकरण झाले आहे. मात्र मुंडीपार ते कोहमारापर्यंत मार्ग अरुंद असल्याने नेहमी या मार्गावर अपघात होत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मुंडीपार ते कोहमारापर्यंत मार्ग रुंदीकरण करणे गरजेचे असून, वेगावर नियंत्रण ठेवणेही तितकेच गरजेचे झाले आहे. पुलाची रुंदी व उंची वाढविणे गरजेचे डव्वा जवळील पूल अरुंद व कमी उंचीचा आहे. या पुलावर ह्यापूर्वी अपघात झाले असून मृत्यू देखील पावले आहेत. या पुलाची उंची व रुंदी वाढविणे गरजेचे असून पुलाच्या दोन्हीही बाजूला असलेली झाडे झूडपी काढणे देखील गरजेचे आहे.

## मुलगा अनब सुनेने डोळ्यादेखत सोडला प्राण; नातवासह आजीवर उपचार सुरू

या बसमधून एकाच कुटुंबातील चार जण प्रवास करीत होते,यात दाम्पत्याचा मृत्यू झाला तर त्या मृताचा मुलगा आणि आई थोडक्यात बचावले. गोरेगाव तालुक्याच्या घोटी येथील सय्यद कुटुंबीय साकोली येथील नातेवाइकाच्या लग्नात गेले होते. जखमी खतीजाबी वासतअली सय्यद (७०) यांच्या नंदेकडे लग्नसमारंभ असल्याने खतीजाबी बासत-अली सय्यद (७०), त्यांचा नातू अल्तास अजहरअली सय्यद (१४), आरिफ्फा अजहर सय्यद (५२) व अजहर अली सय्यद (५५) हे चौघेही गेले होते. लग्न समारंभ आटोपून ते घरी येत असताना या बसच्या अपघातात अतिजाबीच्या आणि अल्तासच्या डोळ्यादेखत आरिफा अजहर सय्यद (५२) व अजहर अली सय्यद (५५) यांचा मृत्यू झाला. ७० वर्षांची खतिजाबी आणि १४ वर्षांचा नातू अल्तास या दोघांवर गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत.

## आनंदाचे क्षण दुःखात बदलले

सय्यद कुटुंबीय पारिवारिक लग्न सोहळा ओटापून आनंदाने आपल्या गावाकडे परतत होते. लग्न सोहळा सुरळीत पार पडल्याने सर्वजण गप्पा गोष्टी करीत शिवशाहीने परतत होते. दरम्यान, खजरीजवळ झालेल्या अपघातात (१४), आरिफा अजहर सय्यद (५२) व अजहर अली सय्यद (५५) यांचा मृत्यू झाल्याने सय्यद कुटुंबीयांचा आनंद क्षणात दुःखात बदलला.

## काल बस चुकली, आज मिळाली शिवशाही

साकोली तालुक्यातील कुंभली येथील प्रकाश हेमने (वय ५५) यांचा शिवशाही अपघातात घटनास्थळी मृत्यू झाला. त्यांच्या मृतदेहाची ओळख सायंकाळी पटली. कुंभली येथील प्रकाश हेमने यांची परिस्थिती बेताची असल्याने ते रायपूर येथे मुलासह कंपनीत कामासाठी राहतात. त्यांच्या विवाहित मुलीचा घरी कार्यक्रम असल्यामुळे ते आठ दिवसांपूर्वी रायपूर वरून कुंभली येथे आले होते. गुरुवारी ते परत रायपूरला जाणार होते. परंतु, त्यांची नागपूर-रायपूर ही बस साकोली येथे चुकल्यामुळे ते परत कुंभली येथे घरी गेले. मुलांचा फोन आल्यामुळे परत ते नागपूर-गोंदिया या शिवशाही बसने गोंदियाला जायला निघाले होते. गोंदियावरून रेल्वेने रायपूरला जाणार होते. तेथे रेल्वे स्टेशनवर त्यांचा मुलगा त्यांना घेण्यासाठी येणार होता. परंतु, काळाने घात केला व त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगी, मुलगा व बराच मोठा आप्त परिवार आहे.



## मृतकांच्या कुटूंबियांना २५ लाखांची मदत द्या-खा.पडोळे

भंडारा कडून साकोली मार्गे गोंदिया कडे जाणाऱ्या शिवशाही बसच्या अपघातात मृत पावलेल्या प्रवाशांकरीता शोकसंवेदना व्यक्त करीत केंद्र व राज्य शासनाने मृत कुटुंबियांना २५ लाख रुपये जाहीर करावे तर जखमी कुटूंबांना १५ लाख रुपये शासनाने तात्काळ जाहीर करावे अशी मागणी खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी केली आहे. सोबतच जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्याशी संपर्क करुन तातडीने मदत व उपचार करण्यासंदर्भात चर्चा केली. सदर घटनेमध्ये मृत पावलेल्या आणि जखमी कुटुंबियांच्या मी सोबत आपण असून मृतांबद्दल संवेदना व्यक्त करीत आपल्या दुःखात सहभागी असल्याचे खा.पडोळे यांनी सांगितले.



या अपघातातील ११ जखमीवर गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु असून गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.नामदेवराव किरसान यांनी जखमींची भेट घेत विचारपूस केली. तसेच भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी अपघातातील घोटी येथील मृत प्रवाशाच्या घरी जाऊन सांत्वन केले.खासदार पडोळे यांनी घोटी ता.गोरेगाव येथील सैय्यद,अर्जुनी मोरगाव येथे सुर्यवंशी,कुंभली येथे हेमने,चांदोरी येथे कनोजे,मोरगाव येथे खेडकर व पिपरी पू.येथील लांजेवार कुटुंबियांच्या घरी जाऊन सांत्वना भेट घेतली.खासदार पडोळे यांनी भंडारा येथील राज्य परिवहन मंडळाच्या अधिकार्यांची भेट घेत भंडारा येथील कार्यशाळेची पाहणी केली.तसेच तेथील कामगारांच्या समस्या ऐकून घेतल्या.

## आमदार बडोले यांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना



अर्जुनी मोर.विधानसभा अंतर्गत सडक/अर्जुनी तालुक्यातील कोहमारा गोंदिया मार्गावरील खजरी डव्वा गावाजवळ आज ता.२९ नोव्हेंबरला झालेल्या एस.टीच्या शिवशाही बसला झालेल्या भिषण अपघाताची माहिती मिळताच आमदार इंजि.राजकुमार बडोले यांनी तातडीने मदत बचाव कार्यासाठी जिल्हाधिकारी तथा संपुर्ण प्रशासनाला सुचना केल्या. तसेच सर्व मृतांना व जखमींना शासनातर्फे त्वरीत मदत मिळावी म्हणुन काळजीवाहु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजीत पवार यांना त्वरीत घटनेची माहीती देवुन भरीव मदत देण्याची विनंती करीत अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशाप्रती आमदार राजकुमार बडोले यांनी शोक संवेदना प्रकट करीत शोक व्यक्त केला आहे. बसमधील सर्व प्रवाशांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी म्हणून भ्रमणध्वनी द्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जिल्हाधिकारी यांना कळवून जिल्हा प्रशासनाला तातडीने शोध व बचाव कार्यासाठी सूचना केल्या.

## सर्वांच्या तोंडी एकच प्रश्न राज अन् रियांशचे काय?



या अपघातात रियांश लांजेवार व राज सूर्यवंशी या दोन्ही चिमुकल्यांचा आधार हिरावला. राजच्या वडिलांचे निधन दोन वर्षापुर्वी झाले होते तर आईच्या आधाराने तो जगत होता. अशातच काळाने अपघातात त्याच्या आईलासुद्धा हिरावून घेतले. तर रियांशच्या आई-वडीलांचा या अपघातात मृत्यू झाला. सध्या तो सुद्धा रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. यातून तो बरा होईल पण पुढे या दोघांच्या भविष्याचे काय? त्यांची जबाबदारी कोण घेणार? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## बसच्या खिडकीच्या काचा फोडून हिम्मतवान युवकाने बाहेर काढले प्रवाशांना



गोंदियाःजिल्ह्यातील कोहमार-गोंदिया राज्य महामार्गावरील खजरी-डव्वा गावाजवळच्या वळणरस्त्यावर आज झालेल्या शिवशाही बसच्या भीषण अपघातात ११ प्रवाशांना आपला जीव गमवावा लागल्याची हृदयविदारक घटना दुपारी १ वाजेच्या सुमारास (दि.२९) घडली. या घटनेने संपुर्ण महाराष्ट्रच नव्हे तर देश शोकमय झाले. ४० प्रवाशांना घेऊन भंडारावरुन गोंदियाला निघालेल्या बसच्या चालकाचे बसवरील नियत्रंण सुटल्याने हा अपघात घडल्याचे बोलले जात आहे.सदर अपघात आपल्या डोळ्याने बघणाऱ्या एका युवकांने कुणाचीही वाट न बघता आपले वाहन रस्त्याच्या कडेला उभे करुन प्रवाशांना वाचविण्याकरीता धाव घेतली. त्या युवकाचे नाव जाबिर शेख असून तो गोंदियाचा रहिवासी आहे. आपल्या साहसाचे परिचय देत बसमध्ये फसलेल्या अनेक महिला,पुरुष व मुलांना बसच्या आत जाणार्या खिडकीचे काच फोडून बाहेर काढले. या घटनेबद्दल बोलतांना जाबिर शेख म्हणाला की, दुपारी १२ वाजून ४४ मिनिटाच्या सुमारास हा अपघात घडला. या बसच्या चपेटमध्ये येण्यापासून आपण किमान ३० सेकदांच्या फरकाने आपण थोडक्यात बचावलो. तेवढ्यात बस ही रस्त्याच्या कडेला उलटून गेलेली होती. बसमधून महिला पुरुष मुलांच्या किंकाळ्या येत होत्या. तर अनेक प्रवासी बसच्या खालच्या भागात दाबले गेले होते.घटनास्थळावरील रक्त व परिस्थिती बघून बसच्या आत जायची कुणाचीच हिमंत होत नव्हती. परंतु आपण हिम्मत बांधत बसच्या आत जाणाऱ्या खिडकीचे काच फोडून प्रवेश केला. व बसमध्ये फसलेल्या १५-१६ महिला पुरुष प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम त्याठिकाणी आलेल्यांच्या मदतीने केले. घटनेनंतर मदतीकरीता आपण गोरेगाव येथील आपले मित्र कदिर यांना फोन करुन मदतीकरीता रुग्णवाहिका व जेसीबीची पाठविण्याची विनंती केल्याचे सांगत बस सरळकरेपर्यंत आपण दीडतास त्याठिकाणीच हजर होतो. त्या घटनास्थळावरील जखमी प्रवाशांच्या आवाज व नातेवाईकाचा मदतीकरीताचा टाहो बघून आपण सुन्न राहिल्याचे सांगितले.

## या मार्गावरील अपघाताच्या घटनांवर एक नजर



- १४ ऑक्टोबर २०२२ रोजी सडक अर्जुनीजवळील चुलबंद नदीच्या पुलावर चारचाकी वाहनाचा अपघात झाला. यात एका मुख्याध्यापकाचा मृत्यू झाला.
- नोव्हेंबर २०२२ मध्ये पाटेकुर्राजवळ काळी पिवळी व शासकीय धान्याचा ट्रक यामध्ये धडक झाली, यात तीन प्रवाशांचा मृत्यू झाला.
- ९ मे २०२३ मध्ये भुसारीटोलाजवळ चारचाकी वाहनाचा टायर फुटल्याने हे वाहन झाडाला आदळले होते. यात वाहनचालकाचा घटनास्थळीच मृत्यू व चार जण जखमी झाले होते.
- १४ मे २०२३ रोजी डव्वाजवळ झालेल्या अपघातात बालकासह वाहनचालकाचा मृत्यू झाला होता.
- चार वर्षांपूर्वी डव्वाजवळील पुलावर पावसाळ्यात ट्रॅक्टर पुलाखाली पडला होता. यामध्ये रोवणी करण्यासाठी जाणारे दोन पुरुष व एका महिलेचा मृत्यू; तर पाच पुरुष व आठ महिला जखमी झाले होते.
- २९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १२.२० च्या सुमारास डव्वा-खजरीलगतच्या वृंदावनटोला फाट्याजवळ शिवशाही उलटली. यात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला. २९ प्रवासी जखमी झाले.

## बस अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची मदत-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबई : गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनीजवळ शिवशाही एसटी बसला झालेल्या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना एसटी महामंडळामार्फत १० लाख रुपयांची मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गोंदिया जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून या अपघातासंदर्भात माहिती घेतली. अपघातातील सर्व जखमींना त्वरित चांगल्या दर्जाचे उपचार देण्यात यावेत, आवश्यकता वाटल्यास जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करावे, अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. जखमींवर शासकीय खर्चातून मोफत उपचार करण्यात यावेत, अशी सूचनाही त्यांनी दिली. अपघाताची घटना अत्यंत दुर्दैवी असून मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

## केंद्राकडून आर्थिक मदत जाहीर

प्रत्येक मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपयांची आर्थिक मदत, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत केंद्र सरकारने जाहीर केली. PMNRF फंडातून ही आर्थिक मदत देण्यात येणार असल्याची माहिती 'पीएमओ'ने दिली. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राष्ट्रपदी दोप्रदी मुर्म यांनी ट्विट करीत घटनेबदद्ल शोक व्यक्त केले आहे.

# मॅटने तहसीलदारांना दिले पुन्हा उत्तर तपासणीचे आदेश

**गोंदिया:-** शासनाकडून आमगाव तालुक्याकरिता कोतवाल भरती घेण्यात आली. या परीक्षेमध्ये प्रश्न क्रमांक २४ च्या अर्थाचा अनर्थ करुन शासनाने चुकीचे मूल्यांकन केले असल्याचे मॅटच्या निदर्शनास आले. त्यामुळे मॅटने आपल्या अंतिम आदेशात शासनाला पुन्हा उत्तर तपासणी करुन योग्य उमेदवाराची निवड करण्याकरिता एक समिती गठीत करुन दोन महिन्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

कोतवाल भरती प्रक्रियेमध्ये प्रश्न क्रमांक २४ स्वच्छता भारत अभियान भारत सरकारने खालीलपैकी कोणत्या वर्षी सुरु केले?. असे विचारले आणि त्याला २०१४,२०१५,२०१७,२०१८ असे पर्याय दिले होते. त्याचे खरे उत्तर २०१४ असे आहे. पण २०१५ अशा उत्तराची शासनाने आदर्श उत्तरपत्रिका तयार केली. सर्व उमेदवारांचे उत्तर २०१५ गृहित धरुन त्यांना गुण दिले. पण त्याचे खरे उत्तर २०१४ आहे. कारण २ ऑक्टोबर २०१४ महात्मा गांधी यांच्या जयंतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केली. तरीही शासनाने या अभियानाची सुरुवात २०१५ ला झाली असे चुकीचे समजून एकंदर देशाच्या इतिहासातील एका घटनेचे वर्ष बदलल्याचे निदर्शनास आले. याचिकाकर्त्याच्यावतीने ॲड. आदिती योगेश पारधी यांनी बाजू मांडली. याचिकाकर्त्याला न्याय मिळवून देण्याकरिता राजू पटले, खुमेश कटरे, सरपंच चुनीलला कुरंजेकर, छबिलाल शहारे यांनी सहकार्य केले.

### चुकीच्या गुणदानामुळे गेले न्यायालयात

या चुकीच्या गुणदानामुळे व्यथित होऊन भुवनेश्वर कुरंजेकर यांनी तहसीलदारांना निवेदन दिले आणि या उत्तराला गुणदान देण्याची विनंती केली. परंतु तहसीलदारांनी तुम्हाला वाटत असेल तर न्यायालयात जा, असे उत्तर दिले. म्हणून कुरंजेकर यांनी महाराष्ट्र प्रशासकीय खंडपीठ नागपूरकडे धाव घेतली. तहसीलदार, एसडीओ, जिल्हाधिकारी यांच्याविरुद्ध मॅटमध्ये याचिका दाखल केली. मॅटने या याचिकेवर अंतिम सुनावणी घेत याचिकाकर्त्याचे म्हणणे बरोबर आहे. स्वच्छता भारत अभियान २०१४ साली सुरु झाले. त्यामुळे याचिकाकर्त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्याच्या दिलेल्या उत्तराला गुणदान देण्यासाठी आणि २०१५ ला दिलेले गुण कमी करण्याकरिता एक समिती गठीत करुन योग्य उमेदवाराची निवड करावी, असे आदेश पारित केले.

# रक्तदानामुळे वाचले सिकलसेलग्रस्त मुलाचे प्राण

**गोंदिया** : जन्मापासून सिकलसेल आजाराने त्रस्त असलेल्या १४ वर्षीय अर्णव वेद्याला वेळोवेळी रक्ताची गरज भासते. या क्रमाने, अर्णवला डॉ. चिखलोंडे (गोंदिया) रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्याची गंभीर प्रकृती पाहता डॉक्टरांनी त्वरित रक्त देणे आवश्यक होते.

या परिस्थितीत अर्णवचे वडील अंकुश वेद त्यांचा रक्तमित्र विनोद चंदवानी (गुड्डू) यांच्याशी संपर्क साधतात आणि त्यांना रक्ताची गरज




असल्याची माहिती देतात. गुड्डूने त्याच्या नियमित बी पॉझिटिव्ह रक्तदात्याच्या यादीशी संपर्क साधला आणि चार्टर्ड अकाउंटंट कुशल चोप्रा यांना माहिती दिली. कसलाही वेळ न दवडता कुशल चोप्राने लोकमान्य रक्तपेढी गाठून रक्तदान करून माणुसकीचे अप्रतिम उदाहरण मांडले. या उदात्त कार्याबद्दल रक्तमित्र विनोद चंदवानी(गुड्डू),हरीश वाधवानी,अंकुश वेद,जी.एस.बरेवार आदी मान्यवरांनी कुशल चोप्रा यांचा लोकमान्य रक्तपेढीत प्रमाणपत्र देऊन गौरव केला.वेद कुटुंबाने कुशल चोप्रा आणि रक्तमित्र विनोद चंदवानी (गुड्डू) यांचे मनापासून आभार व्यक्त केले आणि ही मदत त्यांची जीवनरेखा असल्याचे म्हटले.